दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २१६ I बुधवार २० मे २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


**कुंडलिनी शक्ती...** श्री ज्ञानेश्वरांची कृपा आहे की बाराव्या शतकात त्यांनी आपल्या ज्ञानेश्वरीमध्ये स्पष्ट लिहिले आहे, सहाव्या अध्यायात की कुंडलिनी नावाची शक्ती आहे नाही तर त्यांच्याआधी आपल्या इथल्या लोकांना कुंडली आणि कुंडलिनी यांच्यातला फरकच माहीत नव्हता. ही शक्ती आपल्या सगळ्यांच्यामधे आहे. तुम्ही कोणत्याही जातीचे असला, ब्राह्मण, शूद्र हे सगळे माणसाने बनवलेलं आहे. तसं कोणीच नाही. मी तर मानतच नाही असं काही आहे जगात आणि कोणीच मानले नाही. साधुसंतांनी कधीच मानले नाही. हे तुम्हाला माहिती आहे. किती तरी साधु-संतांची उदाहरणे आहेत. तुम्हाला माहिती आहे प्रभू श्रीरामांनी एका भिल्लीणीच्या दाताने उष्टी झालेली बोरे किती प्रेमाने खाल्ली. त्याच्यात काय सिद्ध केले त्यांनी की ही जात-पात वर-खाली असं काहीही नाही. सगळे मानव एकच आहेत. सगळ्यांमध्ये ती कुंडलिनी असते. कुंडलिनी सगळ्यांमध्ये असतांना तुम्ही असे कसे म्हणता ? यांची जात अमकी, यांची जात तमकी, त्यांची जात अमकी हे नंतर काहीतरी गौडबंगाल लोकांनी सुरू केलं पण वास्तविक सबंध मानवजात एक आहे हे सहजयोगाने सिद्ध होऊ शकते. कारण सगळ्यांमध्ये कुंडलिनी शक्ती आहे. मग तो विलायतेतला मनुष्य असो वा हिंदुस्थानातला असो. सगळ्यांमध्ये जर कुंडलिनी आहे तर मग तो वर खाली जातीय अमका तमका कसा होईल? मी हे मानतच नाही म्हणजे नाहीच असं! तुम्ही ही मानू नका. – २५ मार्च १९९९ पुणे अधिक माहितीसाठी



'सहजयोग'

भाग ५६

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### पेट्रोल-डिझेलच्या भावात चार दिवसांत दुसऱ्यांदा वाढ

मुंबई : अवघ्या चार दिवसात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलच्या दरात हे ९१ पैशांनी तर डिझेलच्या दर ९४ पैशांनी वाढ करण्यात आली आहेत. त्यामुळे मुंबईतील पेट्रोलच्या दर थेट १०७.४९ तर डिझेलचा भाव प्रति लिटर ९४.०२ रुपयांच्या घरात पोहोचला आहे. १५ तारखेला पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत तीन रुपयांनी वाढ करण्यात आली होती आणि आता अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा दरवाढ करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे.

# शेतकरी कर्जमाफीला आचारसंहितेचा अडसर..?

## निर्णय लांबणीवर पडणार : सरकारच्या भूमिकेकडे राज्याच्या नजरा

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे.

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबवणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्विकृत सदस्य आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे.

मात्र, सर्वसामान्यपणे असे मोठे निर्णय घेण्याचे टाळले जाते, असं तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अशात, राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीसंदर्भात काय प्रक्रिया पुढे केली जाते आहे हे बघणे महत्त्वाचे ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जूनअखेरपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्याचे संकेत दिले होते. राज्यातील ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना लाभ मिळण्याची शक्यता आहे.




■ **सुमारे २७ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार राज्य सरकारवर पडणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकीत पीककर्जावर दोन लाखांपर्यंत माफी प्रस्तावित आहे.**

**नियमित कर्जफेड करणाऱ्या २० लाख शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. आचारसंहिता संपल्यानंतरच मंत्रिमंडळात प्रस्तावावर निर्णय अपेक्षित असल्याची माहिती आहे.**

# 'पीके'च्या एन्ट्रीने पुन्हा उभारीचा प्रयत्न

## अजितदादांनंतर राष्ट्रवादीची नवी धुरा

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकस्मात निधनानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली उभा राहिलेला राष्ट्रवादी काँग्रेसचा राजकीय डोलारा सध्या नव्या वळणावर उभा आहे. पक्षात भावनिक पोकळी निर्माण झाल्यानंतर आता नेतृत्व, संघटन आणि आगामी निवडणुकांची रणनीती या तिन्ही आघाड्यांवर नव्याने बांधणी करण्याची वेळ पक्षावर आली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या एन्ट्रीमुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

सध्या पक्षाची सूत्रे उपमुख्यमंत्री सुनेत्र पवार यांच्या नेतृत्वाखाली सांभाळली जात आहेत. मात्र अजितदादांच्या करिष्माई नेतृत्वानंतर कार्यकर्त्यांना एकत्र ठेवणे आणि पक्षाला नवसंजीवनी देणे हे मोठे आव्हान मानले जात आहे. अशातच प्रशांत किशोर यांच्यासोबत सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची झालेली बैठक राजकीय वर्तुळात विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

दरम्यान, पार्थ पवार यांनी या चर्चांवर प्रतिक्रिया देताना, पीके मुंबईत आले होते. आम्ही त्यांना घरी जेवणासाठी बोलावले होते. भविष्यात गरज भासल्यास आम्ही एकमेकांसाठी उपलब्ध राहू, असे सांगितले.

लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर अजित पवार यांनी नरेश अरोरा यांच्या 'डिझाईन बॉक्स' संस्थेची मदत घेत पक्षाची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला होता. गुलाबी कॅम्पेनमुळे अजितदादांची वेगळी ओळख निर्माण झाली आणि त्याचा फायदा विधानसभा निवडणुकीत पक्षाला झाल्याचे मानले गेले. मात्र त्यांच्या निधनानंतर ती मोहीमही थांबली.

आता राष्ट्रवादीसमोर प्रश्न केवळ नेतृत्वाचा नाही, तर कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास पुन्हा उभा करण्याचाही आहे. त्यामुळे 'पीके फॅक्टर' पक्षाला नवसंजीवनी देतो का, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

■ **बैठकीत आगामी निवडणुकांची दिशा, संघटनात्मक बदल आणि पक्षाची प्रतिमा नव्याने उभारण्याबाबत चर्चा झाल्याचे समजते. १ जूनपासून प्रशांत किशोर राष्ट्रवादीसाठी काम सुरू करणार असल्याची माहिती समोर येत आहे. २०२९ च्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यासोबत तीन वर्षांचा करार होण्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. प्रशांत किशोर हे देशातील आघाडीचे निवडणूक रणनीतीकार मानले जातात. भाजपसह अनेक राष्ट्रीय पक्षांसाठी त्यांनी काम केले असून निवडणूक व्यवस्थापनातील त्यांची शैली वेगळी मानली जाते. मात्र बिहार विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला अपेक्षित यश मिळाले नव्हते. तरीही संघटनात्मक नियोजन आणि प्रचारातील नाविन्यपूर्ण प्रयोगांमुळे त्यांचे नाव आजही प्रभावी मानले जाते.**

# गोदावरी वसाहतीची जागा रहिवाश्यांच्या नावावर करणार - डॉ. विखे पाटील

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचे नाव सात बारा उताऱ्यावर येईल. आपण विधानसभा निवडणुकीच्या वेळी दिलेला शब्द पाळला असल्याचे प्रतिपादन भाजपा चे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. .

राहाता तालुक्यातील साकुरी येथील गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचे जागेच्या संदर्भात विशेष पाठपुरावा करून तेथील रहिवाश्यांच्या नावावर जागा करण्याबाबत डॉ. विखे पाटील यांनी रहिवाशी व स्थानिक कार्यकर्त्यांची बैठक राहाता बाजार समितीत घेतली. त्या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, मोहन सदाफळ, संजू सदाफळ, डॉ स्वाधीन गाडेकर, नगराध्यक्ष, विजय सदाफळ उपनगराध्यक्ष नगरसेवक कैलास सदाफळ, मुन्ना शहा, राजेंद्र निकाळे, सुधाकर दंडवते, कानीफ बावके, संदिप दंडवते, भारत बनसोडे, सचिन बनसोडे, शिवाजी नजन,सतिश बावके, विकास बावके, हरिश शीखडे, रमेश गायकवाड, पप्पू बनसोडे, बबन बनसोडे, अक्षय रोहोम, बाबासाहेब डांगे, रावसाहेब बनसोडे, पुंडलिक बावके, नंदा माळी, चंद्रकांत बनसोडे, बाळू जाधव, सुनील लोखंडे, दीपक शिंदे, दीपक दंडवते, शहा, किशोर दंडवते आदी यावेळी उपस्थित होते.

आपल्या भाषणात डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले, राहाता येथील ३४० आणि साकुरीची गोदावरी वसाहत या जागेबाबत अनेक मोठ्या तंत्रिका अडचणी निर्माण झाल्या होत्या. जागा वनविभागाची आहे (पान ४ वर)

**गुन्हेगारी मोडीत काढायची आहे...** मतदार संघात धर्म, जात याला थारा देणार नाही. गुन्हेगारीला साथ देऊ नका. आपल्याला मतदार संघातील गुन्हेगारी मोडीत काढायची आहे. मुलींची कुणी छेड काढत असेल तर त्याच्या घरावर बुलडोझर चालविण्यास मागे पुढे पाहणार नाही. **– डॉ. सुजय विखे पाटील**



## पंढरपूरात महिला स्वच्छतागृहात चोरून चित्रीकरणाचा प्रयत्न

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**पंढरपूर :** अधिक मास सुरू झाल्याने देशभरातून हजारो भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये दाखल होत आहेत. या भाविकांमध्ये मोठ्या संख्येने महिला आणि तरुणींचा समावेश आहे. त्याचवेळी मंदिर परिसरातील महिला स्वच्छतागृहात मोबाईलवर चोरून चित्रीकरण करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**गंध लावणाऱ्या तरुणांवर संशय**
मंदिर परिसरात गंध लावण्याचे काम करणाऱ्या काही तरुणांपैकीच एखादा या घटनेत सहभागी असू शकतो, अशी शंका संबंधित महिलेने व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासनाने या सर्वांची चौकशी करून जबाबदाऱ्या निश्चित करण्याची मागणी होत आहे.

दोनच दिवसांपूर्वी अशाच स्वरूपाची घटना घडली होती आणि (पान ४ वर)

# 'संपन्न ऊर्जा राष्ट्र' उभारणीत महाराष्ट्राची मोठी झेप

## अणुऊर्जा क्षेत्रात ६.५ लाख कोटींची गुंतवणूक; १.२३ लाख रोजगार निर्मिती



**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** देशाला 'संपन्न ऊर्जा राष्ट्र' बनविण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून त्यामुळे स्वच्छ ऊर्जा निर्मितीसह रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत राज्य शासनाने अणुऊर्जा क्षेत्रातील चार प्रमुख कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. यामध्ये NTPC Limited, Adani Power, Reliance Industries आणि ललितपूर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे.

या करारांद्वारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मिती व सुमारे १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र स्वच्छ ऊर्जा निर्मितीत देशात नेहमीच अग्रेसर राहील. अणुऊर्जा ही भविष्यातील ऊर्जा गरजांसाठी अत्यंत महत्त्वाची असून या गुंतवणुकीमुळे औद्योगिक विकासालाही गती मिळेल. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पांच्या जागांचे सर्वेक्षण करून अंमलबजावणीला वेग द्यावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

करारानुसार अदानी पॉवर १.५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती करणार आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटींची गुंतवणूक करून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती करणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत. एनटीपीसी लिमिटेडकडून ७२०० मेगावॅट तर बजाज समूहाकडून ५ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे.

या बैठकीस ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच संबंधित कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# करंदी दरोडा प्रकरणातील टोळीवर 'मोक्का'ची कारवाई

## अहिल्यानगरसह पुणे ग्रामीण भागात दहशत निर्माण करणाऱ्या सहा आरोपींवर वाढीव कलमे

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** तालुक्यातील करंदी येथील वस्तीवर दरोडा टाकून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटणाऱ्या सराईत टोळीविरुद्ध पोलिसांनी म हाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई केली आहे. या टोळीने अहिल्यानगर व पुणे ग्रामीण परिसरात दरोडे, जबरी चोरी, घरफोडी आणि मारहाणीचे गंभीर गुन्हे करत दहशत निर्माण केली होती.

या टोळीचा प्रमुख विशाल उर्फ कोंग्या नरेश काळे (रा. माजमपूर, ता. पारनेर) याच्यासह पंकज नरेश काळे, प्रविण नरेश काळे, सचिन नरेश काळे, गिरीष आलम काळे व संदीप उर्फ गोट्या विठ्ठल भैड यांच्यावर मोक्काअंतर्गत वाढीव कलमे लावण्यात आली आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी पारनेर, शिरूर, आळेफाटा आणि मंचर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संघटित टोळी तयार करून घातक शस्त्रांच्या बळावर दरोडे, जबरी चोरी, घरफोडी तसेच शिवीगाळ व दमदाटीचे एकूण १२ गंभीर गुन्हे केले होते. या टोळीमुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व अपर पोलीस अधीक्षक यांच्या माध्यमातून मोक्काअंतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावाची छाननी करून तो विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

विशेष पोलीस महानिरीक्षकांनी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक अधिनियम १९९९ अंतर्गत कलम ३(१)(ळळ), ३(२) व ३(४) लावण्यास मंजुरी दिली.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास नगर ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने करत आहेत. दरम्यान, भविष्यात जिल्ह्यात गंभीर स्वरूपाचे मालमत्तेविरुद्ध व शरीराविरुद्ध गुन्हे करणाऱ्या आरोपींवरही मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# स्वाती चिटणीस आणि दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्कार

## नाट्य परिषदेचे पुरस्कार जाहीर : संकर्षण कऱ्हाडे, पर्ण पेठे यांचाही गौरव

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबईतर्फे दरवर्षी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी यंदाच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षी ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती चिटणीस आणि ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



हा पुरस्कार वितरण समारंभ रविवार, १४ जून रोजी दुपारी ४ वाजता मुंबईतील यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मराठी रंगभूमीवरील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकार, तंत्रज्ञ आणि कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल स्वाती चिटणीस आणि दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या दोन्ही कलाकारांनी आपल्या बहुआयामी अभिनयातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे.

व्यावसायिक नाट्य पुरस्कारांमध्ये प्राजक्त देशमुख यांना सर्वोत्कृष्ट लेखक, अमेय दक्षिणदास यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, तर (पान ४ वर)

**प्रशांत दामले यांच्या अध्यक्षतेखाली सोहळा**
प्रशांत दामले यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार असून उपाध्यक्ष (उपक्रम) भाऊसाहेब भोईर आणि प्रमुख कार्यवाह अजित भुरे यांनी ही माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. नाट्य परिषदेचे सभासद आणि रसिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य खुला असणार आहे.

# शिक्षणाचा बाजार आणि भविष्याची चोरी

देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणारी नीट परीक्षा आज विश्वासार्हतेच्या कठोर कसोटीवर उभी आहे. अलीकडील पेपरफुटी प्रकरणाने केवळ एका परीक्षेची गुप्तता भंग केली नाही, तर भारतीय शिक्षण व्यवस्थेतील नैतिक दिवाळखोरी उघड करून दाखवली आहे. या प्रकरणाकडे फक्त पेपर लीक म्हणून पाहणे ही मोठी चूक ठरेल. प्रत्यक्षात ही विद्यार्थ्यांच्या मेहनतीची, पालकांच्या विश्वासाची आणि देशाच्या भवितव्याची सामूहिक चोरी आहे.

या घोटाळ्यात अटक झालेली काही व्यक्ती ही केवळ हिमनगाची टोके आहेत. वास्तविक या मागे एक सुसंघटित आणि पांढरपेशा रॅकेट कार्यरत असल्याचे चित्र समोर येत आहे. काही दलाल, शिक्षण संस्थांशी संबंधित लोक, खाजगी क्लासेसचे जाळे, तांत्रिक माध्यमांचा गैरवापर करणारे गुन्हेगार आणि व्यवस्थेतील भ्रष्ट घटक यांच्या संगनमतातून हा काळाबाजार उभा राहिला आहे. विद्यार्थ्यांना सेटिंग, मदत, गॅरंटी अशा नावाखाली लाखो रुपयांचे आमिष दाखवले जाते. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देणे, बनावट उमेदवार बसवणे, डिजिटल उपकरणांच्या माध्यमातून उत्तरे पोहोचवणे किंवा परीक्षा केंद्रांमध्ये संगनमताने कॉपी घडवून आणणे, या सर्व पद्धती आता संघटित गुन्हेगारीचे रूप धारण करत आहेत.




या प्रकरणाचा सर्वात धक्कादायक भाग म्हणजे समाजातील तथाकथित प्रतिष्ठित आणि सुशिक्षित घटकांचा सहभाग. शिक्षण क्षेत्राशी संबंधित काही लोकांनीच शिक्षणाचे व्यापारीकरण करून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा बाजार मांडला आहे. पूर्वी शिक्षक हा समाजाचा नैतिक मार्गदर्शक मानला जायचा; पण आज काही ठिकाणी शिक्षणसंस्था आणि क्लासेस हे फक्त रिझल्ट फॅक्टरी बनले आहेत. नैतिकता, ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकास याऐवजी गुण, रँक आणि पैसे हेच केंद्रस्थानी आले आहेत.

एक काळ असा होता की महाराष्ट्रातील शाळा आणि महाविद्यालये गुणवत्ता आणि शिस्तीसाठी ओळखली जात होती. विद्यार्थ्यांना वर्गात उपस्थित राहून शिक्षण घ्यावे लागायचे. शिक्षकांप्रती आदर आणि अभ्यासाप्रती बांधिलकी होती. मात्र गेल्या दीड दशकात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बाजारीकरण झाले. अकरावी-बारावीच्या शिक्षणापेक्षा खाजगी क्लासेस महत्त्वाचे ठरवले गेले. कॉलेज हे केवळ औपचारिकता बनले आणि प्रत्यक्ष शिक्षण क्लासेसच्या हवाली झाले. अनेक ठिकाणी विद्यार्थी वर्षभर कॉलेजमध्ये फिरकत नाहीत, तरी उपस्थिती आणि परीक्षा प्रक्रिया व्यवस्थित दाखवली जाते. ही फसवणूक सर्वांनाच माहिती असते ˉ संस्थाचालकांना, शिक्षण विभागाला, पालकांना आणि विद्यार्थ्यांनाही.

आज परिस्थिती इतकी विकोपाला गेली आहे की कॉपी चालणारे कॉलेज ही काही विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाची बाब बनली आहे. प्रामाणिकपणे हजेरी घेणाऱ्या, नियम पाळणाऱ्या आणि गैरप्रकारांना विरोध करणाऱ्या संस्था आर्थिक अडचणीत येत आहेत; तर शॉर्टकट शिकवणाऱ्या संस्था भरभराटत आहेत. हा बदल अत्यंत धोकादायक आहे. कारण शिक्षण म्हणजे फक्त नोकरी किंवा पैसा कमावण्याचे साधन नसते; ते समाज घडवण्याची प्रक्रिया असते. पण आज विद्यार्थ्यांना मेहनतीपेक्षा व्यवस्था कशी लावायची हे शिकवले जात आहे.

या संपूर्ण व्यवस्थेची मोडस ऑपरेंडी अत्यंत भयावह आहे. प्रथम विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात भीती निर्माण केली जाते ˉ स्पर्धा खूप आहे, प्रामाणिक मार्गाने यश कठीण आहे. त्यानंतर खाजगी क्लासेस आणि एजंट्सच्या माध्यमातून विशेष मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले जाते. परीक्षा केंद्रे, काही अधिकारी आणि तांत्रिक माध्यमांचा वापर करून गैरप्रकार राबवले जातात. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबे या रॅकेटचा लाभ घेतात, तर प्रामाणिक आणि गरीब विद्यार्थी अन्याय सहन करतात. परिणामी मेहनतीवरचा विश्वास कमी होतो आणि भ्रष्टाचारच यशाचा मार्ग आहे, अशी मानसिकता तयार होते.

याहूनही गंभीर बाब म्हणजे या परिस्थितीला समाजाने हळूहळू स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. पालक अभिमानाने सांगतात की त्यांचा मुलगा फक्त क्लासेस करतो. विद्यार्थ्यांच्या नैतिक शिक्षणापेक्षा रिझल्ट अधिक महत्त्वाचा झाला आहे. भव्य इमारती, एसी वर्गखोल्या आणि कोट्यवधींच्या जाहिरातींनी शिक्षणाचा खरा दर्जा ठरत नाही. अनेक संस्था बाहेरून चकचकीत दिसतात; पण आतमध्ये व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांसाठी जागाच उरलेली नाही.

नीट पेपरफुटी ही केवळ परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी नाही; ती भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या अधोगतीची जाहीर कबुली आहे. डॉक्टर होणारा विद्यार्थी जर फसवणूक करून पुढे गेला, तर भविष्यात रुग्णांच्या जीवाची जबाबदारी कोण घेणार? इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी जर कॉपीच्या आधारावर पात्र ठरत असेल, तर देशाच्या विकासाची पायाभरणी किती मजबूत राहील? शिक्षणातील भ्रष्टाचार हा केवळ वैयक्तिक गुन्हा नसून, तो राष्ट्रीय सुरक्षेचाही प्रश्न आहे.

आज गरज आहे ती केवळ आरोपींना अटक करण्याची नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या शुद्धीकरणाची. परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करणे, खाजगी क्लासेसच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करणे, बनावट उपस्थिती आणि परीक्षा गैरप्रकार करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणामध्ये नैतिकतेचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. देशाचे भविष्य केवळ रस्ते, पूल आणि उद्योगांवर उभे राहत नाही; ते प्रामाणिक, सक्षम आणि नैतिक नागरिकांवर उभे राहते. जर शिक्षणच भ्रष्ट झाले, तर भविष्यातील भारताची पायाभरणीच ढासळेल. त्यामुळे नीट पेपरफुटी प्रकरण हे केवळ एक गुन्हेगारी प्रकरण नसून, शिक्षण वाचवण्यासाठी दिलेला अंतिम इशारा आहे. आता तरी समाज, शासन आणि शिक्षण व्यवस्था जागी झाली नाही, तर उद्याच्या पिढ्यांना आपण ज्ञान नव्हे, तर फसवणुकीची परंपरा देऊन जाऊ.

# राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत चाईल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूलचा शंभर टक्के निकाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील सलबतपूर येथील चाईल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूल ऍन्ड ज्युनियर कॉलेजचा नुकत्याच झालेल्या राज्य शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. संस्थापक अध्यक्ष प्रा. सागर बनसोडे सर यांनी याबाबत विद्यालयाने या ही वर्षी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असल्याचे म्हटले आहे.

या परीक्षेमध्ये एकूण बारा विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यातील सर्वच विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले.यामध्ये ऋषिकेश सुरेश कोहक,शीतल आदिनाथ निकम,सृष्टी अनिल साळुंके,आरव राहुल पेहरे,अनिकेत विठ्ठल औताडे,पृथ्वीराज रविकांत शेळके,चैतन्य राजेंद्र कु-हाडे,वेदांत मोहन नजन,भक्ती अनिल शेजुळ, चैतन्य श्रीकृष्ण कु-हाडे,सोहम गणेश साळुंके,श्रुतिका रामकिसन कोरडे यांनी विशेष यश संपादन केले.

यशस्वी विद्यार्थ्याचे चाईल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूल अँन्ड ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य पालक व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.तसेच संस्थापक प्रा.सागर बनसोडे सरांनी ग्रामीण भागात या शैक्षणिक संकुलाची उभारणी करून दर्जेदार शिक्षण देत शेतकऱ्यांची मुले शिष्यवृत्ती मध्ये चमकवली असल्याने या भागातील पालकांनी प्राचार्य व शिक्षकांचे देखील कौतुक करत त्यांना धन्यवाद दिले आहे.




# टायगर ग्रुपकडून अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** टायगर ग्रुप लोणीचे अध्यक्ष आण्णा ब्राम्हणे यांच्या वाढदिवसानिमित्त गुहा येथील गंगाधर बाबा छात्रालय व अनाथ आश्रम येथे सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी आश्रमातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच अन्नदानाचा कार्यक्रमही संपन्न झाला.

या उपक्रमांतर्गत आश्रमातील सुमारे १०० विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, स्कूल बॅग आदी शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना भोजन देत वाढदिवस साध्या व समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्यात आला.

आश्रमाचे संचालक पप्पू सपकाळ यांनी मनोगत व्यक्त करताना टायगर ग्रुपच्या कार्याचे कौतुक केले. टायगर ग्रुपच्या माध्यमातून आश्रमात सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातात. तान्हाजी भाऊ जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांकडून आश्रमातील मुलांना नेहमीच मदतीचा हात दिला जातो. अशा उपक्रमांमुळे मुलांना मोठा आधार मिळतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष बंटी भिंगारदिवे यांनीही सामाजिक कार्याला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. वाढदिवस, उत्सव आणि आनंदाचे क्षण समाजातील गरजू घटकांसोबत साजरे करणे हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी सागर भिंगारदिवे, सुहास ब्राम्हणे, बाळा कुटे, धनु चव्हाण, विजय साबळे, मच्छिंद्र दराडे, अनिकेत खरात, विजय भोसले, महिंद्रा खरात, वैभव शेलार आदींसह टायगर ग्रुपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोल्हापूर परिक्षेत्राचे नवे आयजी म्हणून रंजनकुमार शर्मा यांची नियुक्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांची विशेष पोलीस महानिरीक्षक गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे बदली झाली आहे. त्यांच्या जागी पुणे येथील सह पोलीस आयुक्त पदावर कार्यरत असलेले आयपीएस अधिकारी रंजनकुमार शर्मा यांची कोल्हापूर विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.२००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले रंजनकुमार शर्मा यांनी यापूर्वी नाशिक परिक्षेत्रात विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून काम पाहिले आहे. तसेच सीआयडी, गुन्हे अन्वेषण पोलीस अधीक्षक म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. सध्या ते पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यालयात सह आयुक्त या पदावर कार्यरत होते. हसमुख अधिकारी म्हणून ओळखले जाणारे रंजनकुमार शर्मा यांचा पोलीस खात्यातील मोठा अनुभव लक्षात घेऊन त्यांच्याकडे कोल्हापूर परिक्षेत्राची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शर्मा यांनी कोल्हापूर परिक्षेत्राचा पदभार स्वीकारला असून, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर या चार जिल्ह्यांची मोठी जबाबदारी आता त्यांच्यावर आहे. नव्या आयजींच्या दमदार एंट्रीमुळे कोल्हापूर परिक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार आहेत .



# तमनर आखाडा येथे जुन्या वादातून तरुणाला बेदम मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** जुन्या भांडणाच्या रागातून एका तरुणावर कोयता व लाकडी दांडक्याने हल्ला करून गंभीर मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील तमनर आखाडा येथे घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत फिर्यादीत नमुद केलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शंकर चिमाजी तमनर (वय २७, रा. तमनर आखाडा, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) हे दि. ८ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेतात होते. त्यावेळी आरोपी बाळासाहेब भिमाजी तमनर, भिमाजी परबत तमनर, प्रतिक बाळासाहेब तमनर व अलका बाळासाहेब तमनर (सर्व रा. तमनर आखाडा, ता. राहुरी) हे त्यांच्या शेतातून घराकडे जात असताना जुन्या वादाच्या कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करू लागले. फिर्यादी यांनी शिवीगाळ का करता? अशी विचारणा करण्यासाठी आरोपींकडे गेल्यानंतर आरोपी बाळासाहेब तमनर याने हातातील कोयत्याने फिर्यादीच्या उजव्या पायाच्या गुडघ्याजवळ वार केला. या हल्ल्यात फिर्यादीचा पाय फ्रॅक्चर झाला. तसेच आरोपी प्रतिक तमनर याने लाकडी दांडक्याने उजव्या पायाच्या घोट्याजवळ तसेच पाठीवर मारहाण केली. उर्वरित आरोपींनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. जखमी फिर्यादीवर विखे फाऊंडेशन हॉस्पिटल, विळद घाट येथे उपचार सुरू आहेत. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५३९/२०२६ अन्वये बीएनएस कलम ११८(१)(२), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अर्जुन दारकुंडे हे करीत आहेत.

# तीन वर्षानंतरही रस्ता खुला न झाल्याने पटारे कुटुंबियांचे आमरण उपोषण सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील धामोरी येथील एका शेतकऱ्यांने आपला गट रस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी नेवासे तहसीलदारांकडे चक्क तीन वर्षांपूर्वी अर्ज आणि सतत पाठपुरावा करूनही अद्यापपर्यंत हा रस्ता खुला न केल्यामुळे तहसील कार्यालयाच्या या अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ सोमवार (दि.१९) पासून सकाळी १० वाजेपासून नेवासा तहसील कार्यालयासमोर धामोरी येथील शेतकरी दत्तात्रय सदाशिव पटारे यांनी आपल्या न्याय मागणीसाठी सहकुटुंब नेवासा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे त्यामुळे महसूल खात्याचा अजब कारभार उघड झाला आहे.




याबाबत अधिक सविस्तर वृत्त असे की धामोरी येथील रहिवाशी असलेल्या दत्तात्रय सदाशिव पटारे यांनी आपला गट रस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी नेवासे तहसील कार्यालयात ७ जून २०२३ रोजी हा गट रस्ता खुला करून मिळणेकामी अर्ज दाखल केलेला होता त्यानंतर या शेतकऱ्यांने वेळोवेळी सतत पाठपुरावा करूनही आजपर्यंत तीन वर्षानंतर सुध्दा हा रस्ता खुला करण्यात न आल्यामुळे या संतप्त झालेल्या शेतकऱ्यांने आपल्या न्याय मागणीसाठी सहकुटुंब अमरण उपोषण सुरु केलेले आहे.

यावेळी बोलतांना दत्तात्रय पटारे या उपोषणार्थी शेतकऱ्याने म्हटले आहे की,धामोरी येथील गट नं.५६ मधील रस्त्यावरून मला रोज दळणवळण करण्यासाठी आणि शेतीच्या मशागतीकामी ट्रॅक्टर तसेच औजारे ने - आण करण्यासाठी प्रचंड अडचणी येत असून लहान मुलांनाही शाळेत येण्या जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर करावा लागतो मात्र हा रस्ता तीन वर्षांपासून खुला करण्याची मागणी नेवासा तहसीलदार यांच्याकडे करून सुद्धा अद्याप खुला झालेला नसल्यामुळे मला जुने पीक सुद्धा विक्रीसाठी नेता येत नसल्याचे म्हटले आहे

हा रस्ता तीन जणांनी सदरचा रस्ता अडवलेला आहे विशेष म्हणजे यातील रस्ता अडवणाऱ्याचे आजोबा पटारे यांनी यापूर्वी हा रस्ता कागदोपत्री लिहून दिलेला आहे तरी सुद्धा महसूल विभागाने हा रस्ता तीन वर्षांपासून अद्यापपर्यंत खुला करून दिलेला नसल्यामुळे शेतीची मशागत आणि शाळकरी मुलांचे प्रचंड हाल होत असल्यामुळे नाईलाजास्तव आम्हाला सहकुटुंब अमरण उपोषण करण्यासाठी आज नेवासे तहसील कार्यालयासमोर बसावे लागले असल्याची संतप्त प्रतिक्रिया यावेळी बोलतांना त्यांनी दिली.

# वृक्षतोड करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी : वहाडणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** ' परिसरात सध्या मोठया प्रमाणावर बेकायदा वृक्षतोड केली जात आहे वृक्षतोडतोड करणारा वर वन विभागाने कडक कारवाई करावी अशी मागणी शेतकरी सेनेचे ( मनसे ) राहाता तालुका अध्यक्ष संदीप वहाडणे यांनी केली आहे. राज्य सरकार वृक्षारोपण करण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करते, मात्र काही जण बेकायदा वृक्षतोड करून निसर्गाची हानी करत आहे. सध्या पुणतांबा -श्रीरामपूर रोड तसेच खैरी निमगाव ते चितळीदरम्यान सार्वजनिक बांधकाम खात्याच्या हद्दीतील मोठमोठी झाडे उघडपणे तोडली जात आहे. काही ठिकाणी तर जेसीबीचा वापर करून मुळासकट झाडे काढण्याचे प्रकार वाढत आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. वृक्षतोडीला आळा बसविण्यासाठी वन विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते यांनी धडक कारवाईची मोहिम राबविण्याची गरज असल्याचेही वहाडणे यांनी स्पष्ट केले आहे.



## देवगडच्या कथेनिमित्त गंगापूर आगारातून जादा एस टी बसची व्यवस्था : विजय बोरसे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड येथे होणाऱ्या भागवत कथा व कीर्तन महोत्सवासाठी गंगापूर एस टी आगारातून विशेष व बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे गंगापूर आगार व्यवस्था विजय बोरसे यांनी सांगितले.

> **भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी देवगड येथील भागवत कथा व दत्त महा यागासाठी विशेष बस गाड्याचे गंगापूर आग्रा तर्फे नियोजन करण्यात आले आहे. बस सेवेचा लाभ भाविकांनी घ्यावा.**
>
> **विजय बोरसे,**
> **आगर प्रमुख, गंगापूर**

गुरुवार (ता.२१) पासून सुरू होणाऱ्या राजस्थान जयपूर येथील गोवत्स राधाकृष्ण महाराज याचे अधिक मासानिमित्त भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथा सोबतच या काळात कीर्तन महोत्सव तसेच दत्त लक्ष्मी याग चे आयोजन गुरुवर्य भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. ता.२१ ते २८ मे या काळात या सह विविध धार्मिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. दरम्यान या कथाकाळात कुठल्याही भाविकाला काही अडचणी आल्यास त्यांनी देवगड संस्थांशी अथवा मोबाईल क्र. ९९२२१९२९९४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचा अहवाल देवगड संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्राजक्त तनपुरें यांच्या भावनिक पोस्टची समर्थकांसह सर्वत्र एकच चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी नगर पाथर्डी विधानसभा मतदार संघाचे आमदार माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या कारणांनी जिल्हात नव्हे तर राज्यात मोठ्या प्रमाणात चर्चेत राहिले आहे . काल प्राजक्त तनपुरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केलीआहे . या पोस्टची चर्चा त्यांच्या समर्थकांसह राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.



त्या पोस्टची चर्चा म्हणजे काल ज्येष्ठ नेते माजी खासदार प्रसाद तनपुरे व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉक्टर उषाताई तनपुरे यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. आजच्या युगात लग्नाचा वाढदिवस कोणाला आठवणार नाही व त्याचाआनंद कुणाला होणार नाही. असे क्वचितच उदाहरण सापडते.

डॉ.उषाताई तनपुरे अर्थात सहकार नेते राजारामबापू पाटील यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांच्या भगिनी त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त प्राजक्त तनपुरे यांनी पोस्ट सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट व्हायरल केली आहे . ती अशी की,आई-बाबा,

तुमच्या सहजीवनाच्या प्रवासाकडे पाहिलं की नेहमी एक गोष्ट जाणवते नातं किती मोठं असतं हे शब्दांनी नाही, तर आयुष्यभर एकमेकांना दिलेल्या साथीतून कळतं. लहानपणापासून तुमच्याकडून खूप काही शिकलो. माणसं जपणं, संकटात खंबीरपणे उभं राहणं, समाजासाठी प्रामाणिकपणे काम करणं आणि कितीही मोठं झालो तरी जमिनीशी जोडलेलं राहणं हे तुमच्याकडून मिळालेले संस्कार म्हणजे माझ्या आयुष्यभराची ताकद आहेत.

आज तुमच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मनापासून एवढंच सांगावंसं वाटतं की, तुमचा मुलगा म्हणून मिळालेली ओळख हीच माझ्यासाठी सर्वात मोठी गोष्ट आहे. तुम्ही दिलेले संस्कार, संघर्षातून लढण्याची ताकद आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द हीच माझी खरी संपत्ती आहे.तुमचं प्रेम, आशीर्वाद आणि साथ अशीच कायम राहू दे. ईश्वर तुम्हाला निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य देवो . अशा आशयाची भावनिक पोस्ट सोशल मीडियावर माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केल्यामुळे सर्वत्र या गोष्टीची चर्चा होत आहे.

# शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने वाचन चळवळीस बळ : उत्तम पाटील




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** ग्रंथ हेच श्रेष्ठ गुरु असून वाचनामुळे मानवी जीवन समृद्ध होते. त्यामुळे प्रत्येकाने पुस्तक वाचनाची सवय लावून वाचन संस्कृती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन मुकुंदराव पाटील स्मारक समितीचे अध्यक्ष उत्तमराव पाटील यांनी केले.

तरवडी येथे शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य शाखा, नेवासा यांच्या वतीने आयोजित फिरते मोफत वाचनालय उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच बाबासाहेब घुले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखेचे उपाध्यक्ष तथा कलाभूषण पुरस्कार विजेते दिगंबर गोंधळी यांनी केले. उपक्रमाचा उद्देश माजी प्राचार्य डॉ. अशोकराव ढगे यांनी स्पष्ट केला, तर शाखाध्यक्ष प्रा. डॉ. किशोर धनवटे यांनी ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी परिषद कार्यरत असल्याचे सांगितले.

यावेळी उत्तमराव पाटील यांनी शब्दगंध नेवासा शाखेच्या फिरत्या मोफत वाचनालयासाठी ४४ पुस्तके भेट दिली. कार्यक्रमास अनिल भारस्कर, अशोक भारस्कर, आत्माराम दरवडे, आदिनाथ पवार, सागर भारस्कर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

शेवटी शाखेचे उपाध्यक्ष पांडुरंग रोडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## प्रवरेच्या कृषिदूतांचे चंद्रापूर येथे स्वागत



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्था, लोणी अंतर्गत कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर येथे गावप्रवेश उत्साहात पार पडला. यावेळी गावचे सरपंच आण्णासाहेब पारधे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या उपक्रमामध्ये गटप्रमुख गीतांजली डोखे तसेच समीक्षा भाबड, अस्मिता गारुळे, अश्विनी हुक्केरी, साक्षी मोटे आणि किर्ती शेरमाळे यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम, महाविद्यालयाचे प्राचार्य व विभाग प्रमुख डॉ. संतोष वर्पे, प्रा.प्रेरणा अभंग तसेच विभाग समन्वयक प्रा. सत्येन खर्डे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपसरपंच दिपाली तांबे, ग्रामसेवक संदीप रामदास शिंदे, ग्रामपंचायत सदस्य रेखा गवळी, प्रदीप माळी, शहाजी तांबे, प्रियंका तांबे आदी ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमास शुभेच्छा देत सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधून आधुनिक शेती पद्धती, कीड व रोग व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, शासनाच्या कृषी योजना तसेच कृषीपूरक व्यवसायांविषयी जनजागृती करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी गाव सर्वेक्षण, शेतभेटी, शेतकरी मार्गदर्शन, कृषी विस्तार उपक्रम तसेच विविध प्रात्यक्षिके आयोजित करणार आहेत.

## पाथरे बुद्रुक येथे प्रवरेच्या कृषीकन्यांचे आगमन



**लोणी** : राहाता तालुक्यातील पाथरे बुद्रुक येथे कृषी महाविद्यालय ,लोणी येथील कृषीकन्यांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीकन्यांचे स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्या प्रेरणेने, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे आणि कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ.अमोल खड़के , कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषीकन्या अपेक्षा मैंद , प्रतीक्षा मुंतोड़े, वैजनता पवार, दिक्षा भोये, कांचन औटी हे पाथरे बुद्रुक येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या प्रसंगी ग्रामपंचायत पाथरे बु.चे प्रशासक उमेश गिताराम घोलप ,उपप्रशासक शाहीना आरिफ शेख, ग्रामपंचायत अधिकारी तुषार अनिल भालेराव ग्रामपंचायत कर्मचारी सुधाकर नाना कदम ग्रामस्थ नितिन बबन कदम, इंदुबाई बालासाहेब कदम व वसीम नसीर तांबोली इतर यांनी स्वागत केले.

## शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत प्राईड अकॅडेमीच्या विद्यार्थिनीचे यश



**श्रीरामपूर** : तालुक्यातील प्राईड अकॅडेमीच्या अनुष्का तुवर हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वी मध्ये यश संपादन करून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अनुष्काच्या या यशामुळे संपूर्ण परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळेतून दिले मार्गदर्शन व स्वयं अध्ययनाच्या जोरावर तिने हे यश मिळविले. शाळेतून जाणाऱ्या विशेष मार्गदर्शन वर्गांचा तिला मोठा फायदा झाला. अनुष्काने आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना, शिक्षकांना व संस्थेला दिले. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर मुरकुटे व प्राईड अकॅडेमीच्या संचालिका डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी तिचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी वंदनाताई यांनी बोलताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणे ही अभिमानाची बाब असून अनुष्काचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा. प्राचार्या, उपप्राचार्य, सर्व शिक्षकवृंद व पालकांनीही कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पुणे कृषि हॅकथॉन २०२६ मध्ये महात्मा

## फुले कृषि विद्यापीठाला २५ लाखांचे प्रथम पारितोषिक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कृषि विभाग महाराष्ट्र शासन आयोजित पुणे कृषि हॅकथॉन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या संवेदक आधारित ताण विशिष्ट नत्र फवारणी यंत्र या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते रुपये २५ लाखांचे कृषि यांत्रिकीकरण या विषयांतर्गत प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या प्रकल्पाच्या संशोधक टीमचे सदस्य डॉ. अवधूत वाळुंज यांनी सदरचा पुरस्कार स्वीकारला. डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी डॉ. प्रणव पावसे आणि इंजि. भूमिका पांडे हे या प्रकल्पाच्या संशोधक टीमचे अन्य सदस्य असून हा प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून साकार झाला आहे. या प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी काम पाहिले. या प्रयोगासाठी स्मार्ट आणि अचूक शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान उत्कृष्टता केंद्रातील संवेदक सुविधांचा लाभ झाला. पिकांच्या गरजेनुसार आवश्यक तिथेच मोजून मापून नत्राची मात्रा देणे या तंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे. यामुळे नत्राच्या खतात बचत होऊन संतूलीत खतांचा वापर होईल. यामुळे शेतकर्यांचा नत्रयुक्त खतांवरील खर्च कमी होऊन पर्यावरणाचेही रक्षण होईल. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या या संशोधक टीमच्या ऐतिहासिक यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी विजयी संघाचे विशेष अभिनंदन केले आहे.

# खुल्या कांद्याचा लिलाव सुरू करा : रवींद्र मोरे

## शिवसेनाशेतकरी सेनेच्या वतीने निवेदन !



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये ट्रॉली मध्ये खुल्या कांद्याचा लिलाव पद्धत सुरू करवा, तसेच कमीत कमी दोन हजार रुपये प्रति क्विंटलने कांदा खरेदी करवा, आदि मागण्यांसाठी शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. शिवसेना शेतकरी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली दि. १८ मे २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपूरे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, कांदा उत्पादक शेतकरी कांद्याचे दर अतिशय कमी असल्या कारणाने संकटात सापडलेला आहे. त्या कांद्याला उत्पादनासाठी केलेला खर्च निघने सुद्धा मुश्किल झाले आहे.

त्यात जुट गोणी बारदाण्याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात भाव वाढले. शेतकऱ्याला ते घेणं आता परवडत नाही. म्हणून राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ट्रॉलीमध्ये खुल्या कांद्याचा लिलाव पद्धत सुरू करण्यात यावी. जेणेकरून व्यापाऱ्यांना कांदा बघून घेता येईल. तसेच तात्पुरत्या स्वरूपात जुटची गोणी न वापरता प्लॅस्टिकच्या गोणीत कांदा मार्केटला आणायला परवानगी द्यावी. तसेच बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी घेऊन आल्यावर काही आडते ते स्वतः खरेदी करतात. शेतकऱ्यांच्या विक्री पट्टीवर खरेदीदार व्यापाऱ्यांचे नाव यायला हवे. तसेच तहसीलदार अमित पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, कांदा उत्पादक शेतकरी अतिशय संकटात सापडलेला आहे. कांद्याचे प्रचंड मोठ्या प्रमाणात भाव पडल्यामुळे शेतकऱ्याचा उत्पन्न खर्चही निघणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे शासनाने फेडरेशनच्या माध्यमातून १ हजार २३५ ने कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. तो अतिशय कमी आहे.

कमीत कमी कांद्याला दोन हजार रुपये प्रति क्विंटल ने खरेदी करण्यात यावी. तर शेतकऱ्यांना थोडाफार काही दिलास मिळेल. तसेच कांद्याला प्रतिक्विंटल १ हजार रुपये अनुदान देण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोंढे, शहराध्यक्ष जालिंदर मुसमाडे, सुनिल सिनारे, संदिप शिरसाठ, सुनील ढूस, सोन्याबापू भांगरे, प्रवीण मकासरे, भास्कर कोळसे, श्रीकांत यादव, काशिनाथ तारडे, कारभारी खुळे, बाळासाहेब म्हसे, अनिकेत कुलकर्णी आदिंच्या सह्या आहेत.

# राजकीय हस्तक्षेपामुळे संगमनेरचा रेल्वे मार्ग बदलला : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : तालुक्याच्या विकासासाठी गेली चाळीस वर्षे सातत्याने काम केले असून मुळा नदीवर बंधाऱ्यांचे जाळे उभे करून पठार भागाला दिलासा दिला. गावोगावी विकासकामे राबवली. मात्र संगमनेरला वरदान ठरणारा नाशिक-पुणे रेल्वेचा साकुरमार्गे सरळ असलेला मार्ग काही मंडळींनी राजकीय हस्तक्षेपातून बदलल्याची टीका काँग्रेस नेते तथा माजी मंत्री इरश्रीरहशल ढहीरीं यांनी केली. तालुक्यात वाढत चाललेली हप्तेखोरी व टक्केवारी ही चिंतेची बाब असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

साकुर येथील विरभद्र लॉन्समध्ये सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते बाजीराव पाटील खेमनर, व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, सभापती शंकरराव खेमनर, व्हीएसआयचे शास्त्रज्ञ डॉ. सुशील कपिल, डॉ. समाधान सुरवसे, इंद्रजीत थोरात यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. थोरात म्हणाले, माजी मंत्री चरवर्हीज़रीीरे झळलहरव यांच्या सहकार्याने मुळा नदीवर बंधारे उभारले. विविध रस्त्यांची कामे मार्गी लावली. २०२४ मध्ये मंजूर झालेली अनेक रस्त्यांची कामे सत्तेवर आल्यानंतर रद्द करण्यात आली.

नाशिक-पुणे रेल्वेसाठी साकुरमार्गे सरळ व सोयीचा मार्ग निश्चित झाला होता. यासाठी शेतकऱ्यांना सुमारे ५०० कोटी रुपयांचा मोबदला देण्यात आला होता. मात्र राजकीय हेतूने रेल्वे मार्ग बदलण्याचा प्रयत्न झाला. ऊस उत्पादकांनी एकरी १०० टन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी डॉ. सुशील कपिल यांनी ऊस बेणे बदलाचे महत्त्व सांगत सीओ-८६०३२ जातीची माहिती दिली. डॉ. समाधान सुरवसे यांनी मातीचे आरोग्य, पाण्याचा योग्य वापर व दक्षिण-उत्तर ऊस लागवडीचे महत्त्व स्पष्ट केले.

दरम्यान, खरशिंदे येथील ६५ वर्षीय गंगुबाई गायकवाड यांनी घरात घुसलेल्या बिबट्याला जेरबंद केल्याबद्दल थोरात यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# बेलापूर - नगर रस्त्यावर स्पीड ब्रेकर्सचे काम

## काम न झाल्यास रास्ता रोकोचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : श्रीरामपूर -बेलापूर ते अहिल्यानगर रस्त्यावर अपघाती ठिकाण असलेल्या बायपास येथे स्पीड ब्रेकर्स टाकावेत अशी मागणी वेळोवेळी करूनही त्याची अद्यापपावेतो अंमलबजावणी झालेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने येत्या पंधरा दिवसात मागणीनुसार स्पीड ब्रॅकर्स टाकावेत. अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ज़िल्हा टॅक्सी असोसिएशनचे अध्यक्ष सुनील मुथा यांनी दिला आहे. यासंदर्भात मुथा यांनी म्हटले आहे की, श्रीरामपूर-बेलापूर ते नगर हा रस्ता अत्यंत राहादरीचा आहे.

सदर रस्ता बेलापूर बायपास येथे 'ब्लाइंड स्पॉट मुळे 'अत्यंत धोकादायक व अपघातप्रवण ठरत आहे.याठिकाणी अनेक लहानमोठे अपघात होत आहेत.त्यामुळे याठिकाणी स्पीडब्रेकर्स टाकावेत अशी मागणी ज़िल्हा टॅक्सी असोसिएशन, बेलापूर ग्रामपंचायत व बेलापूर पोलीस स्टेशन यांनी पत्राद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, श्रीरामपूर यांचेकडे केली होती. याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीरामपूर यांनी याबाबताचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, संगमनेर यांचेकडे पाठविला. त्यांनी सदर प्रस्ताव रस्ता सुरक्षा समिती अध्यक्ष तथा ज़िल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडे मंजुरीसाठी पाठविला. तथापि वेळोवेळी पाठपुरावा करूनही अद्यापपावेतो या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत कार्यवाही झाली नाही. यावरून सार्वजनिक बांधकाम विभागास याबाबत गांभीर्य नसल्याचे दिसून येते. यामुळे वाहनचालकांमध्ये असंतोष आहे. याची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत रस्ता सुरक्षा समितीकडे पाठपुरावा करून मंजुरी प्राप्त करून येत्या पंधरा दिवसात प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी. अन्यथा पंधरा दिवसानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता बेलापूर बायपास या ठिकाणी रस्तारोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा श्री,मुथा यांनी दिला आहे.

# पात्र असूनही अपात्र

## 'लाडकी बहीण' योजनेतील गोंधळामुळे लाभार्थींमध्ये संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर** : राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेत पात्र असूनही अनेक महिलांना अपात्र ठरविण्यात आल्याचा प्रकार समोर आल्यानंतर श्रीरामपूर पंचायत समिती कार्यालयात महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्रता पूर्ण करूनही लाभ नाकारण्यात आल्याने महिलांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. योजनेसाठी शासनाने वार्षिक उत्पन्नाची मर्यादा अडीच लाख रुपये निश्चित केली होती. अनेक महिलांनी मागील आर्थिक वर्षात 'निल आयटीआर' अथवा अडीच लाख रुपयांच्या आत उत्पन्न दाखवून आयकर विवरणपत्र भरले होते.

काही महिलांनी यावर्षी आयटीआर भरलेला नसतानाही त्यांना थेट अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोप महिलांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे निकष पूर्ण करूनही लाभ नाकारला जात असेल तर शासनाची ही योजना केवळ दिखाऊ ठरत आहे, अशी भावना महिलांनी व्यक्त केली. पंचायत समिती कार्यालयात सकाळपासून महिलांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

अनेक महिलांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे आपल्या अर्जांची फेरतपासणी करण्याची मागणी केली. मात्र प्रशासनाकडून स्पष्ट मार्गदर्शन मिळत नसल्याची तक्रारही महिलांनी केली. काही महिलांनी ऑनलाइन प्रक्रियेमधील तांत्रिक त्रुटी, चुकीची माहिती आणि अपूर्ण पडताळणीमुळे पात्र महिलांवर अन्याय होत आहे, असा आरोप केला. दरम्यान, शासनाच्या धोरणाविरोधात महिलांमध्ये संतापाची लाट असून अडीच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या महिलांना पात्र ठरविण्याचा निर्णय शासनाने घेतला असेल, तर त्याची प्रामाणिक अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे.

> शासनाने जर वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २.५० लाख निश्चित केली असेल आणि संबंधित महिलेने २.५० लाखांपर्यंतच आयटीआर भरला असेल, तर त्या महिलेला अपात्र कसे ठरविले जाऊ शकते? हा प्रश्न आता महिलांमधून मोठ्या प्रमाणात उपस्थित होत आहे. शासनाचा निकष अडीच लाख रुपयांपर्यंतचा असेल, तर त्या मर्यादेत आयटीआर भरलेल्या महिलांना पात्र घोषित करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

अपात्र ठरविण्यात आलेल्या महिलांची पुन्हा तपासणी करून त्यांना न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही काही महिलांनी दिला आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रकारावर नाराजी व्यक्त केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या योजनेतच गोंधळ आणि विसंगती दिसून येत असल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करून पारदर्शक यंत्रणा उभी करावी, अशी मागणी होत आहे. योजना सुरू करताना मोठ्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्ष लाभ देताना पात्र महिलांनाच दारात उभे केले जाते.

शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्वरित निर्णय घ्यावा, अशी प्रतिक्रिया संतप्त महिलांकडून व्यक्त करण्यात आली.

# 'एक तळ, एक वन' उपक्रम राज्यभर राबवा : निवेदन





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : पर्यावरण संवर्धन आणि जलस्त्रोतांच्या संरक्षणासाठी राज्यभरात 'एक तळ, एक वन' हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा, अशी मागणी वसुंधरा वृक्ष संवर्धन समिती, श्रीरामपूर यांच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी शेळके यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

सोमवारी (दि. १८ मे) झालेल्या या भेटीत महाराष्ट्र कृषक समाज संघटनेच्या अध्यक्ष माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांच्या उपस्थितीत समितीच्या अध्यक्षा . निताताई डंबीर, ट्रस्टी . अर्चनाताई पानसरे आणि . सुरेखाताई कडूसकर यांनी गावोगावी तलाव परिसरात वृक्षलागवड आणि संवर्धनावर आधारित 'एक तळ, एक वन' उपक्रम महाराष्ट्र शासनाने व्यापक स्वरूपात राबवावा, अशी मागणी करणारे निवेदन सादर केले.

जलस्त्रोतांचे जतन, भूजल पातळी वाढ आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. ग्रामीण भागात तलाव परिसर हरित करण्यासाठी लोकसहभागातून मोहीम उभारल्यास पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी अधिकाऱ्यांनी उपक्रमाबाबत सकारात्मक भूमिका घेत विविध स्तरांवर याबाबत विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.


### जाहीर प्रगटन

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जामखेड यांचे कार्यालय ता. जामखेड जि. अहिल्यानगर**

क्र. कावि/जन्म /१५९/२०२५
दि ७/०५/२०२६
जन्म प्रकरण क्र. १५९/२०२५
**अर्जदार** – गणी गफुर पठाण, रा. नान्नज, ता. जामखेड
जन्म दाखला नाव–गणी गफुर पठाण
**विरुद्ध** - १) निबंधक जन्म मृत्यू विवाह नोंदणी, ग्रामपंचायत नान्नज

समस्त जामखेड तालुक्यातील नागरिकांना कळविणे येते की या कार्यालयात गणी गफुर पठाण रा. नान्नज यांनी गणी गफुर पठाण यांचा जन्म नान्नज ता. जामखेड या ठिकाणी दिनांक ०१/०५/१९८२ या दिवसी झाल्याचे जन्म प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात अर्ज केला आहे. वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

संबधित जाहीरनामा दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करून विहित कालावधीत आलेले आक्षेप बाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जामखेड**

### जाहीर प्रगटन

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जामखेड यांचे कार्यालय ता. जामखेड जि. अहिल्यानगर**

क्र. कावि/जन्म /१६१/२०२५
दि ७/०५/२०२६
जन्म प्रकरण क्र. १६१ / २०२५
**अर्जदार** – शबनुर निजाम पठाण, रा. नान्नज, ता. जामखेड
जन्म दाखला नाव–शबनुर निजाम पठाण
**विरुद्ध** - १) निबंधक जन्म मृत्यू विवाह नोंदणी, ग्रामपंचायत नान्नज

समस्त जामखेड तालुक्यातील नागरिकांना कळविणे येते की या कार्यालयात शबनुर निजाम पठाण रा. नान्नज यांनी शबनुर निजाम पठाण यांचा जन्म नान्नज ता. जामखेड या ठिकाणी दिनांक ०१/०३/१९८९ या दिवसी झाल्याचे जन्म प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात अर्ज केला आहे. वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

संबधित जाहीरनामा दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करून विहित कालावधीत आलेले आक्षेप बाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जामखेड**

### जाहीर प्रगटन

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जामखेड यांचे कार्यालय ता. जामखेड जि. अहिल्यानगर**

क्र. कावि/जन्म /१६०/२०२५
दि ७/०५/२०२६
जन्म प्रकरण क्र. १६० / २०२५
**अर्जदार** – अलिशा गणी पठाण, रा. नान्नज, ता. जामखेड
जन्म दाखला नाव–अलिशा गणी पठाण
**विरुद्ध** - १) निबंधक जन्म मृत्यू विवाह नोंदणी, ग्रामपंचायत नान्नज

समस्त जामखेड तालुक्यातील नागरिकांना कळविणे येते की या कार्यालयात अलिशा गणी पठाण रा नान्नज यांनी अलिशा गणी पठाण यांचा जन्म नान्नज ता. जामखेड या ठिकाणी दिनांक १४/०१/२००८ या दिवसी झाल्याचे जन्म प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात अर्ज केला आहे. वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

संबधित जाहीरनामा दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करून विहित कालावधीत आलेले आक्षेप बाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार जामखेड**

## पान १ वरुन

### स्वाती चिटणीस आणि दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्कार

सकर्षण कराडे यांना सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार जाहीर झाला आहे. पर्ण पेठे यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळणार आहे. 'बोलविता धनी' या नाटकाला सर्वोत्कृष्ट व्यावसायिक संगीत नाटकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ओंकार प्रभुघाटे यांना सर्वोत्कृष्ट गायक अभिनेता, तर संपदा माने यांना सर्वोत्कृष्ट गायक अभिनेत्री म्हणून गौरविण्यात येणार आहे. प्रायोगिक नाट्य विभागात 'कर्ण' या नाटकाला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक, तर 'संगीत पद्मराणी'ला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संगीत नाटकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. आशुतोष वाघमारे, इरफान मुजावर आणि आश्विनी आंचवले यांचाही सन्मान होणार आहे.

### पंढरपूरात महिला स्वच्छतागृहात चोरून चित्रीकरणाचा प्रयत्न

त्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा अशाच प्रकारची घटना समोर आल्याने पोलीस, मंदिर प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एक महिला स्वच्छतागृहात गेली असता तिने एका तरुणाला भिंतीवर चढून मोबाईलद्वारे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न करताना पाहिले. संबंधित महिलेनं आरडाओरड केल्यानंतर तो तरुण घटनास्थळावरून पळून गेला. त्यानंतर स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना बोलावून या प्रकाराची माहिती देण्यात आली. या गंभीर प्रकारानंतर सामाजिक कार्यकर्ते विक्रम शिरसाट यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. महिला भाविकांच्या (पान ४ वर) सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना न केल्यास मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. काही दिवसांपूर्वी पंढरपुरात असाच प्रकार घडला होता. भाविकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या दर्शन मंडपातील स्वच्छतागृहात चक्क दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे आणि गुटखा-मावाच्या पुड्या आढळून आल्या होत्या. त्यानंतर आता महिलांच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

### गोदावरी वसाहतीची जागा रहिवाश्यांच्या नावावर करणार - डॉ. विखे पाटील

आणि अनेक अडचणी येतील अशी काहींनी शंका उपस्थित केली होती. परंतु सुजय विखे पाटलांनी दिलेला शब्द पूर्ण करतात, हा सर्व सामान्य जनतेला विश्वास होता. आणि आपण या बाबत प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून विश्वास सार्थ ठरवला. या जागेच्या बाबतीत सर्वात मोठी अडचण सातबाऱ्यावर सरकार असे नाव लागले होते. गुंतागुंत वाढली होती. परंतु दोन दिवस आधी आपण महाराष्ट्र शासन असे नाव लावून घेतले. त्या मुळे आता कायदेशीररित्या स्थानिक नागरिकांच्या नावावर जागा करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्या मुळे तुमची जागा तुमच्या नावावर फक्त आणि फक्त सुजय विखे च करू शकतो! असे सांगून डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले, अनेक वर्षापासून जागा नावावर करण्याचा संघर्ष ३४० व गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचे संपला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाने हा प्रश्न सोडविला. विधानसभेच्या निवडणुकीत तुमची जागा तुमच्या नावावर करून देतो हा शब्द आपण पाळला. याचा आपल्याला अभिमान आहे. आपण राजकारणात ऐश्वर्य कमावले, वैभव कमावले परंतु आपण विश्वासाहर्ता कमावली हा मोठा आनंद आहे. शिर्डीतील लक्ष्मीनगर भागातील आपल्या शब्दावर काढले. पोलिस फाटा लागला नाही. त्या मुळे आता प्रत्येकाच्या नावावर २५ लाख रुपये किमतीची जागा झाली आहे.

### नावात बदल

माझे जुने नाव अदिल(ADIL) शेराली सय्यद (SAYYED)(माझे १० वी व १२ वी मार्कशिट वरील नाव) असे असून माझे नवे व खरे नाव आदिल (ADIL) शेराली सय्यद (SAYYAD)(माझे आधार कार्ड वरील नाव) असे आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही प्रतिज्ञापत्र क्र.- ६५२२४२०४१२६८१००६७६४०० दिनांक १९/०५/२०२६

# रात्रीच्या वेळी वाहनांमधील डिझेल चोरणारी टोळी जेरबंद

## एलसीबी पथकाची सिनेस्टाईल कारवाई; चार आरोपी ताब्यात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राहुरी : नगर-मनमाड राज्य महामार्गावर रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांमधून डिझेल चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला. राहुरी तालुक्यातील गुहा परिसरात सिनेस्टाईल पाठलाग करत पोलिसांनी चार जणांना जेरबंद केले असून एक आरोपी फरार झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्य महामार्गावर डिझेल चोरीच्या घटना वाढल्या होत्या. याबाबत पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या आदेशानुसार पोलिस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे व त्यांच्या पथकाने १८ मे रोजी रात्री गस्त सुरू केली होती. दरम्यान, राहुरी-कोल्हार रोडवर पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती गुप्त खबऱ्याकडून मिळाली.

पथकाने गुहा परिसरात संबंधित कार अडविण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी वाहन सुसाट वेगाने पळविले. पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू केला. काही अंतरावर राहुरी फॅक्टरी परिसरातील बालाजी ढाब्यानजीक आरोपींनी कार सोडून काटवनात पळण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून चौघांना पकडले. या कारवाईत पोलिसांनी चारचाकी वाहनासह २ लाख १५ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात करण उर्फ राजेंद्र साळुंखे, सनी उर्फ सल्ल्या पवार, जितेंद्र वाघमारे, प्रणव चौधरी व निलेश मोकळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश मोकळ हा अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# रत्नपारखी यांच्या दुकानात स्वस्त धान्य गहू,तांदूळ उपलब्ध ; नागरिकांमध्ये समाधान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** – शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानदार गणेश माधवराव रत्नपारखी यांच्या दुकानात आगामी दोन महिन्यांचे स्वस्त धान्य गहू,तांदूळ उपलब्ध झाले आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून त्यांच्याकडे नोंदणी असलेल्या शिधापत्रिका धारकांची आधारकार्ड सह धान्य घेण्यासाठी गर्दी करताना पाहावयास मिळत आहे.सोमवार दि.१८ ला शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुका अध्यक्ष असलेले कवठे येमाई येथील स्वस्त धान्य दुकानदार गणेश रत्नपारखी यांच्या स्वस्त धान्य दुकानास भेट दिली असता स्वस्त धान्य घेण्यासाठी महिला व नागरिकांची मोठी गर्दी झालेली पाहावतास मिळाली.पुढील दोन महिन्यांचे धान्य उपलब्ध झाल्याने उपस्थित शिधापत्रिका धारकांमधून सरकारचे मनोमन आभार मानले आहेत. सध्याचा कडक उन्हाळा,वाढती महागाई व आणि पावसाळयाच्या तोंडावर सरकारने गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना पुढील दोन महिन्याचा शिधा उपलब्ध करून दिल्याने उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले आहे.तर सध्या उपलब्ध झालेले स्वस्त धान्य वाटप संपल्यानंतर उर्वरित शिधापत्रिका धारकांसाठी ही लगेच धान्य उपलब्ध होणार असल्याची माहिती गणेश रत्नपारखी यांनी दिली.



# पुरंदरमध्ये एटीएस ची मोठी कारवाई २८ लाखांचा चंदनसाठा जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी** :- पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने पुरंदर तालुक्यातील मांडकी येथे धडक कारवाई करत तब्बल ५६० किलो चंदन साठा जप्त केला. या कारवाईत अंदाजे २८ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

मांडकी येथील एका शेतामध्ये हिरव्या कापडाखाली लपवून ठेवलेले चंदनाचे ओंडके, बॅटरीवर चालणारा कटर व दोन लोखंडी ड्रिल पोलिसांना आढळून आले. हा साठा चोरीचा असून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रतिक प्रमोद खुंटे (रा. मांडकी, ता. पुरंदर) याच्याविरुद्ध जेजुरी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०३(२), भारतीय वन अधिनियम तसेच महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. ही कारवाई पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, बारामती अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार व जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दहशतवाद विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, विशाल गव्हाणे, पोलीस हवालदार निलेश कदम, रविंद्र जाधव, पोलीस अंमलदार मोसीन शेख, ओंकार शिंदे, जालिंदर मुळीक तसेच जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

# विविध महामंडळाच्या लाभार्थ्यांचे कर्ज माफ करण्याची सुनील वाघमारेंची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांची नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथील शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख सुनील वाघमारे यांनी भेट घेऊन शेतकरी,महिला, विद्यार्थी, अपंग व वंचीत घटकांच्या विविध प्रश्नांच्या संदर्भात झालेल्या चर्चेद्वरे लक्ष वेधले. यावेळी विविध महामंडळातील लाभार्थ्यांकडे असलेली थकबाकी माफ करून त्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्यात यावा अशी मागणी दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी नामदार संजय शिरसाठ यांच्याशी झालेल्या चर्चे प्रसंगी सुनील वाघमारे यांनी मागासवर्गीय महामंडळ, महात्मा फुले महामंडळ,अण्णाभाऊ साठे महामंडळ, आदिवासी विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ मधील सर्व थकबाकी माफ करून लाभार्थ्यांना नव्याने कर्जपुरवठा करावा,दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेसाठी दारिद्रय रेषेखालील अट वगळून त्यामध्ये मागासवर्गीय व भूमिहीनांना यातील योजनेचा लाभ मिळावा या संदर्भात चर्चा केली.

राज्यातील वसतिगृहात अपंग व विधवा महिलांच्या मुलांना मोफत प्रवेश देण्यात यावा जेणेकरून त्यांच्या कुटुंबातील मुले ही शिक्षित होऊन त्यांच्या कुटुंबाचा भविष्यकाळात आधार बनू शकतील, यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना मोठा दिलासा मिळेल असे झालेल्या चर्चेत मागणी केली. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष किशोर वाघमारे,उपाध्यक्ष विनोद साळवे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.झालेल्या चर्चेद्वरे मांडण्यात आलेल्या विविध प्रश्नांचे निवेदन सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाठ यांना देण्यात आले.




## निधन वार्ता

### भाऊसाहेब जोर्वेकर



**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब बाबुराव जोर्वेकर (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, तीन बहीणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे योगेश व सागर जोर्वेकर यांचे ते वडील होत.

### साहेबराव मोरे



**श्रीरामपूर** - तालुक्यातील उक्कलगाव येथील छाया न्यूज पेपर एजन्सीचे वितरक साहेबराव केशव मोरे ( वय ७० ) यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, भाऊ, भावजयी, एक मुलगी, सुना,नातू,पुतणे,असा मोठा परिवार आहेत. उक्कलगावसह गळनिंब परिसरातील अनेक गावांमध्ये सलग ४५ वर्षे पेपर एंजट म्हणून काम केले. सध्या ते दैनिक राष्ट्र सह्याद्री या वृत्तपत्रामध्ये वितरक म्हणून काम करित होते.अशोक सहकारी साखर कारखान्याचे कर्मचारी सोन्याबापू व रविंद्र त्यांचे ते वडील होत.

### नीता सातदिवे



**श्रीरामपूर** : नीता भास्कर सातदवे (वय-६६) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या ग्रामीण रुग्णालयातील सेवानिवृत्त डॉ.भास्कर सोनाजी सातदिवे यांच्या पत्नी डॉ. सुशांत सातदिवे, प्रशांत सातदिवे व सविता आदेश गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

# कासार समाजातील वधू-वरांसाठी ३१ मे रोजी पुण्यात भव्य 'जीवनसाथी' मेळावा; देश-विदेशातून ऑनलाईन सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : कासार समाजातील विवाहइच्छुक तरुण-तरुणींना योग्य जोडीदार निवडता यावा, यासाठी पुण्यात भव्य-दिव्य वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे जिल्हा विकास समिती आणि सो. क्ष. कासार श्री कालिकादेवी संस्थान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी 'जीवनसाथी' वधू-वर परिचय मेळावा पार पडणार आहे.

बिबवेवाडी येथील गंगाधाम चौकातील वर्धमान सांस्कृतिक केंद्र,शत्रुंजय मंदिर येथे सकाळी ०९:०० वाजल्यापासून हा मेळावा सुरू होईल. संपूर्ण महाराष्ट्र तसेच देश-विदेशातील कासार समाजातील उमेदवारांसाठी हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे अशी माहिती अनिल भांडेकर यांनी दिली.

जास्तीत जास्त विवाह जमवणे हा मुख्य हेतू ठेवून या मेळाव्याची रचना अत्यंत आधुनिक पद्धतीने करण्यात आली आहे. वधू-वरांना एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलता यावे यासाठी विशेष बैठक व्यवस्था (परिचय कक्ष) असेल. तसेच 'टीम दोस्त' ही तरुणांची टीम उमेदवारांमधील संवाद सुलभ करेल.परदेशात राहणारे समाजातील उमेदवारही या मेळाव्यात ऑनलाईन पद्धतीने थेट सहभागी होऊ शकणार आहेत.उमेदवार स्टेजवर परिचय देत असताना, त्यांच्या बॅकग्राउंडला मोठ्या स्क्रीनवर त्यांची संपूर्ण माहिती फ्लॅश केली जाईल. पालक आणि मुलांमध्ये विचारांची एकसूत्रता आणण्यासाठी समुपदेशन केले जाईल. याशिवाय ज्योतिष, कायदेतज्ज्ञ (वकील) आणि डॉक्टरांचे विशेष मार्गदर्शन वधू-वर व पालकांना मिळणार आहे.

सुसज्ज हॉल, प्रशस्त पार्किंग आणि सर्वांसाठी सुग्रास जेवणाची उत्तम सोय करण्यात आली आहे. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांना www.punekasa.com या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन नावनोंदणी करणे आवश्यक आहे अशी माहिती अनिल भांडेकर यांनी दिली.या मेळाव्याचे पुणे जिल्हा विकास समिती आणि सो. क्ष. कासार श्री कालिकादेवी संस्थान, पुणे यांच्या वतीने आयोजन करण्यात आले असून

राजेंद्र अचलारे, आनंद डांगरे, रमाकांत कानडे, अनिल भांडेकर, भास्कर अंदुरे, रंगनाथ उंडे, स्मिता धारूरकर, मंजुषा किवडे,स्वप्नील जुन्नरकर, रोहन उंडे, मंदार सासवडे व त्याचे सहकारी विशेष परिश्रम घेत आहेत.

### जाहीर नोटीस

श्रीरामपूर येथील मे. उपविभागीय अधिकारी साहेब, भाग श्रीरामपूर यांचे न्यालयातील आरटीएस अपील अर्ज क्रमांक २९०/२०२५

ज्योतीप्रभा मनोहर पाटील
(ज्योतीप्रभा मनोहर आनेकर) व इतर १--- अर्जदार
विरुध्द
१. सुर्यकांत मनोहर पाटील - प्रतिवादी
२. नंदकिशोर सुर्यकांत पाटील- प्रतिवादी
३. अशोक मनोहर पाटील -प्रतिवादी
४. रमेश मनोहर पाटील (म.वा.) - प्रतिवादी
४अ. रंजना रमेश पाटील- प्रतिवादी
४ब. शैलेश रमेश पाटील - प्रतिवादी
४क. तेजस्वीनी रमेश पाटील- प्रतिवादी
प्रति,

१. सुर्यकांत मनोहर पाटील रा. सागर व्हिडीओकॉन समोर, डॉ. कॉलनी मागे वाकडी रोड, अहिल्यानगर २. नंदकिशोर सुर्यकांत पाटील रा. बोधेगाव ता. राहुरी जि. अहिल्यानगर ३. अशोक मनोहर पाटील रा. कल्याणरोड, भावनातऋषी, श्री. शिवाजीनगर, प्लॉट नं.१८, शेडगे वखारीजवळ, अहिल्यानगर ४. रमेश मनोहर पाटील (म.वा.) ४अ. रंजना रमेश पाटील, ४ब. शैलेश रमेश पाटील, ४क. तेजस्वीनी रमेश पाटील ४अ ते ४क रा. नवरंग कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.८, तांबेनगर बारामती, ता. बारामती, जि. पुणे ज्या अर्थी अर्जदार ज्योतीप्रभा मनोहर पाटील (ज्योतीप्रभा मनोहर आनेकर) व इतर १ रा. अहिल्यानगर, ता. जि. अहिल्यानगर यांनी आपले विरुध्द या न्यायालयात, तहसिलदार राहुरी यांनी ईक्युजे केस क्र. १०७/२०२३ मध्ये दि. ३१/०७/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाविरुद्ध आर टी एस अपील दाखल केलेले आहे. सदर अर्जात आपण प्रतिवादी म्हणुन सामील आहात, आपणास या न्यायालयामार्फत वारंवार नोटीस पाठवुन देखील नोटीस बजावणी होत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाचे कामकाज लांबणीवर पडत आहे.

त्याअर्थी आपणास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आपण नोटीस प्रसिध्द झाल्या पासून नेमलेल्या तारखेपूर्वी म्हणजे दिनांक २२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० व. तहसिल कार्यालय राहुरी येथे आपण स्वतः अगर आपले वकीलामार्फत हजर होवुन आपले म्हणणे द्यावे. आपण हजर न राहील्यास प्रकरणाची एकतर्फे सुनावणी घेवून पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदरची जाहीर नोटीस आज दिनांक १८/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी दिली आहे.

शिक्का

उपविभागीय अधिकारी
श्रीरामपूर भाग श्रीरामपूर

# टेम्पो,कार,दुचाकीच्या तिहेरी अपघातात एक ठार तर पाच जण जखमी

## शिरूरच्या पाबळ-कान्हूर मेसाई रोडवरील घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : - शिरूरच्या पश्चिमेकडील पाबळ जवळील कान्हूर मेसाई रस्त्यावर सोमवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास टेम्पो,कार,दुचाकीच्या तिहेरी अपघातात एक ठार तर पाच जण जखमी झाल्याची घटना घडली.या भीषण अपघातात पाबळ येथील रिक्षाचालक भास्कर शिवलाल मकवाणे या ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला.तर कान्हूर मेसाईच्या घोलपवाडी येथील आशा बाळू घोलप, खैरेनगरचे ४२ वर्षीय दुचाकीस्वार सतीश भाऊसाहेब खैरे,पाबळ जवळील मोटारचालक संभाजी भगवान जाधव,गणेश बबन आगरकर,काळूराम तुकाराम चौधरी अशी या अपघातातील जखमींची नावे आहेत.याप्रकरणी सुधीर सदाशिव मकवाणे यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या



माहितीनुसार,सोमवारी सकाळच्या सुमारास पाबळकडून येणारी कार एम एच १२ टी के ३१६९ अचानक विरुद्ध दिशेला गेल्याने समोरून येणाऱ्या रिक्षा क्रमांक एम एच १४ ई एच २६५० यांची सामोरा समोर जोरदार धडक झाली. त्याचवेळी शेजारून जाणाऱ्या दुचाकीला एम एच १२ एच एक्स ९४९६ कारची देखील धडक बसली. यामध्ये रिक्षा टेम्पो व कार च्या समोरच्या बाजूने मोठे नुकसान झाले तर रिक्षा चालकाचा मृत्यु झाला.या अपघातात महिलेसह पाच जण जखमी झाले आहेत.दुचाकीस्वार थोडक्यात बचावला आहे. पोलिसांनी मोटारचालक संभाजी भगवान जाधव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस हवालदार संतोष शेळके करत आहेत.नशीब बलवत्तर म्हणून या अपघातात शिरूर तालुक्यातील खैरेनगरचे माजी उपसरपंचसतीश खैरे हे या अपघातात थोडक्यात बचावले.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

### नशिबाची परिक्षा

बुधवार दि .२० मे २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१२० ४९० ६७० | ३-४ | १५८ २४८ २२०
जोड ३९-८४-७१-२०-४९

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१९० २८० २२६ | ०-२ | १५६ १२९ १४०
जोड ०६-३२-४८-७८-२९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१२५ २६० २२४ | ८-१ | १२८ १४६ १००
जोड ८०-३१-२५-६७-१९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

# द•ख•ल

## अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीची सुटका

**अहिल्यानगर :** कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अपहरण झालेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत कोतवाली पोलिसांनी सलग ३६ तास थरारक तपास करत मुलीची सुटका केली आणि संशयित आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास एका १७ वषय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले होते. याप्रकरणी संशयित आरोपी प्रदीप उर्फ व्हन्या परशुराम इजगत (रा. रेल्वे स्टेशन बोहरी चाळ, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध पीडितेच्या पालकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी आणि मुलगी बेपत्ता होते. पोलीस त्यांचा कसून शोध घेत होते. दरम्यान, आरोपी हा मुलीसह पुणे शहरातील वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत लपून बसल्याची गोपनीय माहिती कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना मिळाली. त्यांनी तातडीने तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल श्वेता परमासागर, पोलीस कॉन्स्टेबल याकूब सय्यद आणि अमोल गाडे यांचे विशेष पथक तयार करून पुण्यात रवाना केले. पुण्यात पोहोचलेल्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने तांत्रिक विलेषणाचा आधार घेतला. सलग ३६ तास पाळत ठेवून पोलिसांनी अखेर आरोपी प्रदीप इजगत याला ताब्यात घेतले आणि अल्पवयीन मुलीची सुटका केली. पोलिसांनी आरोपीला अहिल्यानगर येथे आणून गुन्ह्यात रीतसर अटक केली आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, उपनिरीक्षक प्रवीण पाटील, श्वेता परमासागर, याकूब सय्यद, अमोल गाडे, राहुल गुंडू आणि नितीन शिंदे यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करत आहेत.

## अभय खोसे यांचा ग्रामविकास आणि साहित्याचा दुहेरी प्रवास ठरतोय जनहितार्थ

**श्रीगोंदा :** तहसील कार्यालयात अभय महादेव खोसे, सध्या ग्राम महापूल अधिकारी म्हणून कार्यरत असून, ग्रामीण विकास आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रात त्यांनी स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. श्रीगोंदा तहसील कार्यालयाच्या अंतरंगात ग्रामविकास म्हणजे तलाठी म्हणून कार्यरत असलेले अभय खोसे यांचा जन्म १ डिसेंबर १९८९ रोजी दुले चांदगाव येथे झाला. त्यांचे वडील महादेव खोत हे आरोग्य कर्मचारी म्हणून जवळके येथे कार्यरत होते. त्यामुळे त्यांचे बालपण ग्रामीण वातावरणात गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, जवळके येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण शेतकरी माध्यमिक विद्यालयात पूर्ण झाले. दहावीचे शिक्षण त्यांनी संगमनेर येथील समता विद्यालयात पूर्ण केले. पुढे बारावीचे शिक्षण लोणी येथील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील ज्युनिअर कॉलेज येथे घेतले.याच काळात वाचनाची गोडी निर्माण झाली. वसतिगृहाशेजारी असलेल्या भव्य ग्रंथालयाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा दिली. पुस्तकांशी जुळलेले हे नाते पुढे साहित्य निर्मितीत परिवर्तित झाले. त्यांना शिष्यवृत्तीच्या जोरावर त्यांना सिंहगड इंजिनियरींग कॉलेज येथे केमिकल इंजिनियर साठी प्रवेश मिळाला. अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना त्यांनी फिल्म आणि टेलिव्हिजन इन्स्टिटयूट भारत मध्ये असिस्टंट डायरेक्टर म्हणूनही काम केले. या काळात अनेक आंतरराष्ट्रीय दिग्दर्शकांसोबत काम करण्याची संधी मिळाली, ज्यामुळे त्यांच्या सर्जनशीलतेला नवी झेप मिळाली.पुढे त्यांनी स्वतःची डांगी कॉटन बँडेज मॅनुफॅक्चर युनिटची स्थापन केली आणि उद्योजकतेतही यश मिळवले. याच काळात त्यांच्या लेखन प्रवासाला गती मिळाली. आजपर्यंत त्यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली असून ती केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर अमेरिका, इंग्लंड, जर्मनी आणि जपानपर्यंत पोहोचली आहेत.



## चंदुकाका सराफ शोरूममधून सोन्याचे मिनी गंठण लांबवले

**अहिल्यानगर :** सावेडी येथील प्रसिद्ध चंदुकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड शोरूममधून तीन अनोळखी महिला आणि एका पुरुषाने ग्राहकाचा बहाणा करून दोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सावेडी शाखेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक सुहास बाहुबली भोसेकर यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन अनोळखी महिला आणि एका पुरुषाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावेडीत अपेक्स रुग्णालयाशेजारी चंदुकाका सराफ यांचे शोरूम आहे. दुपारी तीन वाजेच्या सुमारास शोरूममध्ये तीन महिला आणि एक पुरुष ग्राहक म्हणून आले होते. त्यांनी दागिने पाहण्याच्या बहाण्याने काउंटरवरील कर्मचाऱ्याला सोन्याचे पट्टीचे शॉर्ट गंठण दाखवण्यास सांगितले. कर्मचाऱ्याने काही दागिने दाखवले, मात्र ते पसंत नसल्याचे सांगून ते सर्वजण खरेदी न करताच शोरूममधून निघून गेले. त्यानंतर काउंटरवरील दागिन्यांची मोजदाद केली असता, त्यामध्ये एक सोन्याचे मिनी गंठण कमी असल्याचे कर्मचाऱ्याच्या निदर्शनास आले. संशय आल्याने शोरूममधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासण्यात आले. त्यामध्ये आकाशी रंगाची साडी नेसलेल्या एका महिलेने काउंटरवरील सोन्याचे मिनी गंठण अत्यंत हुशारीने उचलून स्वतःच्या साडीत लपवल्याचे स्पष्ट दिसले. चोरट्यांनी १६ ग्रॅम वजनाचे आणि २ लाख रुपये किमतीचे हॉलमार्क असलेले सोन्याचे मिनी गंठण चोरून नेले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी परशुराम करत आहेत.

## दारूच्या नशेत तरुणाला दगडाने मारहाण माळीवाडा परिसरातील घटना

**अहिल्यानगर :** शहरातील माळीवाडा भागातील पारिजात लॉज जवळ दारूच्या नशेत एका इसमाने तरुणाला विनाकारण शिवीगाळ करत दगडाने गंभीर मारहाण केली. याप्रकरणी अक्षय अविनाश रासकर (वय ३८, रा. महात्मा फुले रोड, माळीवाडा) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अक्षय रासकर यांचे चहा-नाश्त्याचे दुकान आहे. १७ मे रोजी रात्री सव्वाअकरा वाजेच्या सुमारास रासकर हे आपले दैनंदिन काम आटपून पारिजात लॉज जवळ बसले होते. त्यावेळी त्यांच्या ओळखीचा कपिल शर्मा (रा. ब्राह्मणगल्ली, माळीवाडा) हा त्या ठिकाणी आला. शर्मा हा दारूच्या नशेत होता. त्याने तिथे येऊन अक्षय यांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. अक्षय यांनी त्याला 'विनाकारण शिव्या का देतोस' असे विचारले. याचा राग आल्याने कपिल याने रस्त्यावरील दगड उचलून थेट अक्षय यांच्या डोक्यात मारला. त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. यामध्ये अक्षय यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवले. रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर अक्षय रासकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी कपिल शर्मा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# नगरसेवक गाडळकर नागरिकांसह रात्रभर जागले !

## काटवन खंडोबा रोड परिसरातील नागरिकांचा पाणी प्रश्न पेटला

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील काटवन खंडोबा रोड रोड, गाझी नगर व साई नगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असताना नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी मध्यरात्री स्वतः धाव घेत नागरिकांना दिलासा दिला. अगोदरच कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, मुख्य जलवाहिनी फुटल्याने निर्माण झालेली अडचण आणि महावितरणच्या वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. अशा परिस्थितीत गाडळकर यांनी स्वतः उपस्थित राहून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

परिसरातील अनेक भागांमध्ये नळांना पाणीच येत नसल्याने नागरिक संतप्त झाले होते. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी धावपळ करावी लागत होती. महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांनी नगरसेवक दत्ता गाडळकर यांच्याकडे तक्रारींचा पाऊस पाडला. नागरिकांच्या अडचणीची गंभीर दखल घेत गाडळकर यांनी तत्काळ पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधत मध्यरात्रीच परिसरात भेट दिली.

रात्री उशिरापर्यंत त्यांनी स्वतः प्रत्येक भागात जाऊन पाणीपुरवठ्याची पाहणी केली.



तब्बल रात्री १ वाजेपर्यंत परिसरात थांबून प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचते का, याची खातरजमा केली. काही भागात कमी दाबाने पाणी येत असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांना तातडीच्या सूचना देत समस्या सोडविण्याचे सूचना केल्या. नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांनी प्रशासनाकडेही पाठपुरावा सुरू केला.

काटवन खंडोबा रोड, गाझी नगर आणि साई नगर परिसरात संपूर्ण उन्हाळाभर पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. मुख्य जलवाहिनीतील बिघाड आणि वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. शहरात पाणी उपलब्ध असतानाही महावितरणच्या गलथान कारभारामुळे पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याची भावना पाणी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

परिसरातील नागरिकांनी सांगितले की, पुढील भागातील अनेक घरांमध्ये नळांना पाणीच येत नाही. काही ठिकाणी अत्यंत कमी दाबाने पाणी येत असल्याने दैनंदिन गरजाही भागत नाहीत. वारंवार होणाऱ्या या समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार थांबले नाहीत तर महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# घनकचरा विभागातील अनागोंदी कारभार थांबवा

## अन्यथा शुक्रवारपासून धरणे आंदोलन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात सुरू असलेल्या मनमानी आणि अनागोंदी कारभाराविरोधात आता सफाई कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. विभाग प्रमुखांकडून सफाई कामगारांच्या मनमानी बदल्या केल्या जात असून कामगारांवर अन्यायकारक पद्धतीने अतिरिक्त कामाचा बोजा टाकला जात असल्याचा आरोप करत अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत निर्णय न घेतल्यास शुक्रवार दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून महापालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर सफाई, चेंबर व गटार कामगारांचे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला आहे.

कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर आणि सचिव आनंद वायकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घरकचरा व्यवस्थापन विभागामध्ये सुमारे ८०० सफाई कामगारांची संख्या असली तरी प्रत्यक्षात फक्त ६५० च्या आसपास





कामगार कार्यरत आहेत. उर्वरित कामगार इतर विभागांमध्ये विविध आदेशान्वये कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत उपनगरांमध्ये कामगारांची संख्या अपुरी असल्याचे कारण देत विभाग प्रमुखांकडून मनमानी पद्धतीने कामगारांच्या बदल्या केल्या जात आहेत. गरज नसताना कामगारांना एका भागातून दुसऱ्या भागात तोंडी आदेशाने पाठविले जात असल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, आधीच अपुऱ्या मनुष्यबळातून काम करणे सफाई कर्मचाऱ्यांना अत्यंत कठीण जात आहे. काही कामगार रजेवर, आठवड्याच्या सुट्टीवर किंवा इतर कारणांनी गैरहजर असतात. त्यामुळे त्यांच्या हद्दीतील कामे देखील उर्वरित कामगारांकडून करून घेतली जातात. त्याचबरोबर स्वच्छता अभियानासाठी प्रत्येक हजेरीवर किमान पाच कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामासाठी बोलावले जाते. परिणामी एका कामगाराकडून दोन-दोन हद्दींची कामे करून घेतली जात आहेत.

कामगार संघटनेने निवेदनात नमूद केले आहे की, सफाई कामगार कोणतीही तक्रार न करता प्रामाणिकपणे काम करत आहेत. ४० अंशांपेक्षा अधिक तापमानामध्ये देखील कामगार ईमानेइतबारे सेवा बजावत आहेत. अनेक कर्मचाऱ्यांचे पगार अद्याप झालेले नसतानाही ते सर्व अडचणींना सामोरे जात काम करत आहेत. मात्र विभाग प्रमुखांकडून कामगारांना स्वतःच्या नोकरांप्रमाणे वागणूक दिली जात असून त्यांच्याशी अरेरावीची भाषा वापरली जाते. कामगार काम करत नाहीत, असे खोटे आरोप देखील केले जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

निवेदनात असेही म्हटले आहे की, जर सफाई कामगारांनी कामे केली नाहीत तर शहरातील नागरिकांना रस्त्यावरून चालणे देखील कठीण होईल. तरीही कामगारांशी अन्यायकारक वागणूक केली जात आहे. शहरातील कामगारांना सावेडी, सावेडीतील कामगारांना केडगाव, तर केडगावमधील कामगारांना बुरुडगाव येथे तोंडी आदेशाने बदल्या केल्या जात आहेत. या बदल्या आकसापोटी केल्या जात असल्याची भावना कामगारांमध्ये निर्माण झाली आहे.

# अहिल्यानगरमध्ये जिल्हा प्रशिक्षण केंद्रात चोरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील सिव्हील हॉस्पिटल आवारात असलेल्या जिल्हा प्रशिक्षण केंद्रात अज्ञात चोरट्यांनी खिडकीची भिंत तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कार्यालयातील मौल्यवान इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर साहित्य असा एकूण २५,५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या घटनेमुळे शासकीय कार्यालयांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

याप्रकरणी केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री संभा शिंदे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दिली आहे. शासकीय सुट्टी असल्यामुळे १५ मे च्या संध्याकाळपासून १८ मे च्या सकाळपर्यंत कार्यालय बंद होते. सोमवारी सकाळी कर्मचारी योगेंद्र पालवे कार्यालयात आले असता, त्यांना दरवाजा आतून बंद असल्याचे आणि वातानुकूलित यंत्र (एसी) सुरू असल्याचे आढळले. संशय आल्याने त्यांनी तात्काळ डॉ. शिंदे यांना माहिती दिली.

पोलिसांच्या मदतीने आत प्रवेश केला असता, कार्यालयातील कपाटे उघडी आणि साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरट्यांनी मागील खिडकीची भिंत तोडून आणि लोखंडी गज मोकळे करून आत प्रवेश केला होता. चोरट्यांनी कार्यालयातून १ म्प्लीफायर, २ प्रोजेक्टर, ३ कॉम्प्युटर साऊंड सिस्टीम, ३ गिझर, १ डीव्हीडी प्लेअर, २ माईक स्टँड, व्हिडिओ कॅमेरा, फोटो कॅमेरा आणि ६० फूट केबल वायर चोरून नेली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण केले होते. या चोरीचा पुढील तपास पोलीस अंमलदार सुनील आंधळे करत आहेत.

# जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांचे वेतन रखडले

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील संचमान्यता दुरुस्ती झालेल्या शंभराहून अधिक शाळांतील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अद्यापही रखडले असल्याने मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. संबंधित संचमान्यता शालार्थ प्रणालीमध्ये 'इंटिग्रेट' न झाल्यामुळे मे २०२६ महिन्याचे वेतन फॉरवर्ड होत नाही. अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने याबाबत शिक्षण विभागाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात माध्यमिक शिक्षक संघाचे सचिन झगडे, अमोल ठाणगे, सोमनाथ सुंबे यांनी निवेदन दिले. यावेळी मुख्याध्यापक सुदाम दळवी, दीपक थोरात तसेच कोपरगाव तालुका संघटनेचे कैलास शेळके उपस्थित होते.

काही शाळांची सन २०२४-२५ या वर्षातील संचमान्यता पदे शून्य झाली होती. त्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक कामकाजात अडथळे निर्माण झाले होते. मात्र सन २०२५-२६ च्या संचमान्यतेमध्ये संबंधित शाळांना पुन्हा पदे मंजूर करण्यात आली असून त्यानुसार संचमान्यता दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, संबंधित संचमान्यता अद्याप शालार्थ प्रणालीमध्ये 'इंटिग्रेट' करण्यात आलेली नाही. परिणामी संबंधित शाळांचे वेतन प्रस्ताव फॉरवर्ड होत नसून मे २०२६ चे वेतन रखडले आहे. अनेक शिक्षक व कर्मचाऱ्यांना घरखर्च, बँक कर्जाचे हप्ते, मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि दैनंदिन आर्थिक व्यवहार सांभाळताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

# पाथर्डीला लवकरच मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा : अभय आव्हाड

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहराला येत्या सहा ते सात महिन्यात मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येईल अशी ग्वाही नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली. जायकवाडी धरणातून शासनाच्या नगरउत्थान योजनेतून जलजीवन मिशन अंतर्गत नवीन नळ पाणीपुरवठा योजनेची नगराध्यक्ष अभय आव्हाड व नगरसेवकांनी पाहणी केली. उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नगरसेवक नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे, सुभाष बोरुडे, डॉ जगदीश मुने, संजय देशमुख, देवा पवार, बाळासाहेब सोनटक्के, प्रतीक नांगरे, नगरसेविका डॉ शारदा गर्जे, वंदना टेके, मनीषा उदमले, पाणीपुरवठा अधिकारी सचिन राजभोज, नळ पाणी योजनेचे राहुल काळे कर्मचारी हरिभाऊ पवार यावेळी उपस्थित होते.

**अमरापूर येथील व्यवसायिकांचे विशेष आभार : आव्हाड**

अमरापूर येथील मुख्य चौकात छोट्या व्यवसायिकांची दुकाने असल्यामुळे तेथील काम बंद होते. मी स्वतः त्यांच्याशी चर्चा करून पाईपलाईन पूर्ण करण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती केली होती. या विनंतीला मान देत स्थानिक व्यवसायिकांनी आपली दुकाने बंद करून पाईपलाईनसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

आव्हाड म्हणाले, आ. मोनिकाताई राजळे यांच्या विशेष प्रयत्नाने शासनाच्या जलजीवन योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन योजना अंतिम टप्प्यात असुन साकेगाव येथील जलशुद्धीकरण केंद्र, अमरापूर येथे चालू असलेले काम तसेच जायकवाडी येथील पाणी उपसा योजनेची पाहणी करून नवीन पाणी योजना लवकरात



लवकर कार्यान्वित करावी अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. जायकवाडी योजनेच्या पाईपलाईन योजना अंतिम टप्प्यात असून ९५% काम पूर्ण झाले आहे. मात्र शेवगाव शहरातील एक किलोमीटर लांबीचा भाग तसेच पैठण जवळील बलदावा फार्म हाऊस या ठिकाणी सुमारे दीड किलोमीटरचे काम अपूर्ण राहिले आहे. बलदावा यांच्याशी चर्चा करून अडथळे दूर करण्याचे विशेष प्रयत्न केले. सध्या पाथर्डी शहराला होणारा पाणीपुरवठा जुन्या पाईपलाईनद्वारे पैठणच्या धरणापासून शेवटच्या टोकाला असलेल्या दहिफळ येथुन होत आहे. कडक उन्हाळ्यामुळे तेथील पाण्याची पातळी कमी झाली आहे.

तसेच शेवगाव पाथर्डी व ग्रामीण भागातील ४८ गावाची एकत्रित पाणी योजना असल्यामुळे पाथर्डीला पाणी पुरवण्यास अडथळा निर्माण होत आहे. यामुळे पाथर्डीकरांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. मात्र नवीन पाईपलाईन योजना ही पैठण धरणाच्या भिंतीजवळ असल्यामुळे पुढील सहा महिन्यात पाथर्डीकरांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.

# गहाळ झालेले नऊ मोबाईल हस्तगत

## बेलवंडी पोलिसांची कामगिरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीत गेल्या दोन वर्षांदरम्यान हरवलेले तब्बल नऊ मोबाईल शोधण्यात बेलवंडी पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत सुमारे २ लाख १० हजार रुपये किमतीचे रेडमी, विवो, वन प्लस आणि सॅमसंग कंपनीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले असून संबंधित मोबाईल धारकांना ते परत देण्यात आले आहेत.

बेलवंडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई फिरोज तांबोळी यांनी तांत्रिक माहिती आणि आधुनिक प्रणालीचा वापर करून हरवलेल्या



मोबाईलचा शोध घेतला.

विविध ठिकाणांहून मोबाईलचा माग काढत पोलिसांनी संबंधित मोबाईल ताब्यात घेतले.

मोबाईल हस्तगत झाल्यानंतर त्यावरील माहितीच्या आधारे संबंधित नागरिकांशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर मोबाईल धारकांना बेलवंडी पोलीस स्टेशन येथे बोलावून त्यांचे मोबाईल परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत बेलवंडी पोलिसांचे आभार मानले.

दरम्यान, नागरिकांचे हरवलेले, मोबाईल,साहित्य शोधून ते परत मिळवून देण्यासाठी बेलवंडी पोलीस सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी सांगितले. पोलिसांच्या या कामगिरीमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून बेलवंडी पोलीस स्टेशनच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Rashtrasant Janardhan Swami Foundation's
Rashtrasant Janardhan Swami College of Physiotherapy
Kokamthan, Kopargaon, Dist. Ahilyanagar, Maharashtra.

Mob: 9765172999/ 7387287675
Email: - rajaswaphysiotherapy@gmail.com
Website: - https://www.rjsgi.com/

VACANCIES

Applications are invited on plain paper along with all necessary copy of certificates from the eligible candidate for the following posts. Qualification & experience as per MS OT PT Council, NCAHP & MUHS norms and university Direction no. 01/2017.

| Sr. No. | Title/Subject | Vacant Post |
|---|---|---|
| 1) | Principal cum Professor (Any Subject) | 01 (Open) |

| Sr. No. | Subject | Professor | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|---|
| 1) | Neurosciences Physiotherapy | Open - 01 | Open - 01 | Open - 01 |
| 2) | Community Physiotherapy | Open - 01 | Open - 01 | Open - 01 |
| 3) | Musculoskeletal Sciences Physiotherapy | Open - 01 | Open - 01 | Open - 01 |
| 4) | Cardio-respiratory Physiotherapy | Open - 01 | Open - 01 | Open - 01 |
| 5) | Kinesiotherapy & Physical Diagnosis | -- | Open - 01 | SC - 01 Open - 01 |
| 6) | Electrotherapy & Electrodiagnosis | -- | Open - 01 | SC - 01 Open - 01 |

Note: - For detailed information about post qualification and other terms and condition please visit college website - https://www.rjsgi.com/ Salary and other terms as per norms. Eligible candidates should send their application to college E-mail id - rajaswaphysiotherapy@gmail.com within 07 days from publication of the advertisement.

Chairman
Secretary

## द•ख•ल

### कवठे येमाई गावठाणात घरासमोरून मोटारसायकल चोरी



**कवठे येमाई : -** शिरूरच्या पश्चिम भागातील कवठे येमाई गावठाणातील घरासमोरील मोकळ्या जागेत उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली आहे. याप्रकरणी निखिल गजानन नेवासकर,वय ३३, व्यवसाय – खासगी नोकरी, रा. कवठे येमाई, ता. शिरूर, जि.पुणे यांनी शिरूर पोलिसांत फिर्याद दिली आहे.त्यानुसार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार दि. १६ रोजी रात्री १० ते दि. १७ एप्रिल २०२६ सकाळी नऊच्या दरम्यान नेवासकर यांच्या कवठे येमाई येथील राहत्या घरासमोरील मोकळ्या जागेतून अज्ञात चोरट्याने होंडा कंपनीची सी.बी. युनिकॉर्न मॉडेलची काळ्या रंगाची मोटारसायकल एम एच १२आर जे १५९४ ही दुचाकी चोरी करून नेली. मोटारसायकलची अंदाजे किंमत ३० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस हवालदार पालवे हे करीत आहेत.

### आचार्य श्री आनंदऋषीजी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**पुणे :** राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज विद्यालयातील (पीएमसी ९९जी) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५–२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील १६ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता. त्यापैकी १४ विद्यार्थी परीक्षेला बसले असून १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशामध्ये मार्गदर्शक शिक्षक स्नेहल गायकवाड, भाग्यश्री झोंड आणि विठोबा पादिर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्याध्यापक श्री. अशोक नामदेव लंघे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. यावेळी मुख्याध्यापक अशोक लंघे म्हणाले, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश संपादन केले आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी अधिक मेहनत घेऊन मोठे यश मिळवावे, हीच अपेक्षा आहे. परीक्षेतील अव्वल विद्यार्थ्यांमध्ये मोहम्मद अर्शान रईस शेख याने २१४ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रिन्सकुमार उमेश साहा याने २१० गुणांसह द्वितीय, तर मधास्वाड साईनाथ पांडुरंग याने १९८ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. तसेच गौड भावना राजेश (१८६) आणि गौड पलक शारदाप्रसाद (१८४) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. या यशाबद्दल पर्यवेक्षक मीना भेंडारी, शैला ठाकूर, स. प्रशासकीय अधिकारी विजय आवारी, उपप्रशासकीय अधिकारी शुभांगी चव्हाण, प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे तसेच उपआयुक्त वसुंधरा लरऑंश यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन केले.

### वडगाव पिरमध्ये वनहद्दीतून खडी वाहतूक; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वडगाव पिर परिसरात वनविभागाच्या हद्दीतून कोणतीही अधिकृत परवानगी न घेता खडी क्रेशरची वाहतूक सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे संबंधित प्रकाराकडे काही अधिकारी पाहुण जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची जोरदार चर्चा परिसरात रंगली



आहे. वनक्षेत्रातून मोठ्या प्रमाणात डंपरडरे खडीची वाहतूक सुरू असून नियमांचे खुलेआम उल्लंघन होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दिवस रात्र सुरू असलेल्या या वाहतुकीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून रस्त्यांची दुरवस्था, धुळीचे प्रदूषण आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्थानिकांच्या मते, वनविभागाच्या हद्दीतून इतक्या मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असताना संबंधित अधिकाऱ्यांना याची माहिती नसणे शक्य नाही. मात्र तरीदेखील कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. सामान्य नागरिकांकडून छोट्या चुका झाल्या तरी तत्काळ दंडात्मक कारवाई केली जाते, मात्र मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या या अवैध वाहतुकीकडे अधिकारी डोळेझाक करत आहेत, अशी तीव्र नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अवैध खडी वाहतूक करणाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बारामती नगरपरिषद शाळांना दर्जात्मक बदलाची दिशा; शिक्षण क्षेत्रात बारामतीचा नवा आदर्श

## भविष्यात प्रवेशासाठी वेटिंग लिस्ट लागेल अशा दर्जेदार बा.न प च्या शाळा होणार



> बारामती नगरपरिषदेच्या शाळा या केवळ शिक्षण देणाऱ्या संस्था नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी करणारी केंद्रे बनली पाहिजेत. आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून भविष्यात प्रवेशासाठी वेटिंग लिस्ट लागेल अशा दर्जेदार शाळा निर्माण करण्याचा आमचा संकल्प आहे.
>
> **` सचिन सातव (नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद)**

> बारामती नगरपरिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, आधुनिक व विद्यार्थीकेंद्रित शिक्षण देण्यासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिक्षकांचा सहभाग आणि पालकांचा विश्वास याच्या जोरावर येत्या काळात नगरपरिषदेच्या शाळा या गुणवत्तेच्या बाबतीत आदर्श ठरतील.
>
> **` श्वेताताई नाळे (उपनगराध्यक्षा तथा शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती, बा. न. प)**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती नगरपरिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष मार्गदर्शन व गुणवत्तावाढ आढावा कार्यक्रमास शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आगामी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात शिक्षण विभागाची भावी दिशा, शाळांमधील गुणवत्तावाढ, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम तसेच शिक्षणातील सकारात्मक बदल यावर सखोल चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव हे उपस्थित होते. यावेळी उपनगराध्यक्षा तथा शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती श्वेताताई नाळे, मुख्याधिकारी पंकज भुसे, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय चे माजी प्राचार्य चंद्रशेखर मुरूमकर, उपगटनेते संपदा चौधर, विशाल हिंगणे, गोरख पारसे, सोमनाथ गजाकस, गणेश जोजारे, शर्मिला ढवाण, मंगला किर्वे, अश्विनी सातव, सविता जाधव,विजया खरात, रूपाली मलगुंडे, मनीषा बनकर, संघमित्रा चौधरी,प्रवीण माने,अमोल कावळे, राजेंद्र सोनवणे, निलेश इंगुले, सुनील सस्ते, विष्णुपंत चौधर, अल्ताफ सय्यद, अविनाश निकाळजे, अभिजीत जाधव, नगरसेवक, नगरसेविका, शिक्षण समिती सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक व आकांक्षा फाउंडेशन चे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्वेताताई नाळे यांनी प्रस्तावना मांडताना शिक्षण समितीमार्फत मागील काही महिन्यांत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आधुनिक व प्रभावी उपक्रम राबवून नगरपरिषदेच्या शाळांमध्ये दर्जात्मक बदल घडवून आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यानंतर शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी अक्षय मांडवे यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये नगरपरिषद शाळांमध्ये राबविण्यात आलेल्या विशेष उपक्रमांची माहिती सादर केली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा त्यांनी उपस्थितांसमोर मांडला.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या माजी प्राचार्य चंद्रशेखर मुरूमकर यांनी शिक्षक व मुख्याध्यापकांना संबोधित करताना बदलत्या शिक्षण पद्धतीनुसार विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रणाली, गुणवत्ता विकास, शाळांमधील सकारात्मक वातावरण आणि शिक्षकांची भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली..मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी आपल्या मनोगतात शिक्षण विभागाच्या प्रगतीसाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत राहील, असा विश्वास व्यक्त केला. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक सुविधा व उपक्रमांना प्रशासनाची भक्कम साथ राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी बारामती नगरपरिषद अंतर्गत सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व रोप देऊन गौरव करण्यात आला. या सत्कार सोहळ्यात उपस्थित नगरसेवक, नगरसेविका तसेच प्रमुख पाहुण्यांनी सहभाग घेतला. तसेच आकांक्षा फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी संस्थेची भूमिका व कार्यपद्धती थोडक्यात मांडली. कार्यक्रमाचा समारोप अल्पोपहाराने करण्यात आला.

# कान्हूर मेसाई परिसरात बिबट्याचा वावर

## नागरिकांमध्ये भीती; पिंजरा लावण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** कान्हूर आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परिसरात बिबट्या वारंवार नागरिकांना दिसून येत असल्याने स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहे.

> ''गेल्या काही दिवसांपासून गावात आणि शेतशिवारात बिबट्याचा वावर खूप वाढला आहे. काल रात्रीही बिबट्या गावाजवळ दिसल्याने शेतकरी शेतात जाण्यास घाबरत आहेत. वनविभागाने तात्काळ पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.''– ॲडव्होकेट तुकाराम पुंडे

मिळालेल्या माहितीनुसार, कान्हूर परिसरातील शेतशिवारात आणि वस्त्यांच्या आसपास काल रात्री पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाले. परिसरात बिबट्याचा सतत वावर असल्याने रात्री–अपरात्री शेतात पाणी भरण्यासाठी किंवा इतर कामांसाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सुदैवाने अजून कोणताही अनुचित प्रकार घडला नसला तरी बिबट्याच्या मुक्त संचारामुळे पाळीव प्राणी आणि नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.



वनविभागाने या वाढत्या वावराची त्वरित दखल घेऊन बिबट्याला जेरबंद करण्यासाठी परिसरात तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.वन कर्मचाऱ्यांनी या भागात रात्रीची गस्त वाढवावी, जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल.

# शिरूरमध्ये शनी जयंती उत्सवाचा भक्तिमय जल्लोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर शहरातील लाटे आळी रोड परिसरात घोडनदीच्या काठावर वसलेल्या जागृत शनिमंदिरात शनी जयंती आणि शनी अमावस्येच्या दुग्धशर्करा योगानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक उत्सवाला भाविकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. शनिवारी पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शिरूर शहरासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी शनिदेवांच्या दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती. शनिदेवांच्या जयघोषाने आणि धार्मिक वातावरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.



मंदिर व्यवस्थापक रवी गोसावी यांनी गेल्या दोन दिवसांपासून अहोरात्र मेहनत घेत संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध आयोजन केले होते. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी स्वतंत्र रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उन्हापासून संरक्षणासाठी सावलीची सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी विशेष सोय करण्यात आली होती. त्यामुळे एवढ्या मोठ्या गर्दीतही कुठेही गोंधळ निर्माण झाला नाही आणि सर्व भाविकांना शांततेत व सुलभ पद्धतीने शनिदेवांचे दर्शन घेता आले.

शनिवार, १६ मे रोजी सकाळी ठीक ८ वाजता मंदिरात मुख्य महाआरती अत्यंत भक्तिभावाने संपन्न झाली. महाआरतीनंतर भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. शनिदेवांच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांनी तेल अभिषेक, पूजा–अर्चा तसेच नवस फेडण्यासाठी मंदिरात उपस्थिती लावली होती. मंदिर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सकाळपासून दुपारी ४ वाजेपर्यंत तब्बल १३ हजार भाविकांनी शनिदेवांचे दर्शन घेत पुण्यलाभ मिळवला.

उन्हाचा कडाका आणि वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने अत्यंत चोख व्यवस्था केली होती. स्वयंसेवकांनी भाविकांना वेळोवेळी मार्गदर्शन करत शिस्त राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, मंत्रोच्चार आणि भक्तीमय वातावरणामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत होता.

दोन दिवसीय उत्सवाच्या निमित्ताने रविवार, १७ मे २०२६ रोजी मंदिरात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हा महाप्रसाद कार्यक्रम होणार असून अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर व्यवस्थापनातर्फे करण्यात आले आहे.

या संपूर्ण उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी काका भोसले, सचिन गरुडे, सुनील जठार, राजेंद्र घोडके, अविनाश जाधव, सुशांत कुटे, शांतनू कोळपे, आर्यन गायकवाड, तेजस ताक, ओम जाधव आणि अदनान सय्यद यांनी विशेष परिश्रम घेत मोलाचे सहकार्य केले.

# जिद्द, चिकाटी आणि मेहनत हाच स्पर्धा परीक्षेतील यशाचा मंत्र : महेश जंजिरे

## 'युपीएससी'तून असिस्टंट कमांडंटपदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी मोठ्या आर्थिक सुविधा किंवा भौतिक साधनांची गरज नसते. जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत हीच यशाची खरी त्रिसूत्री आहे, असे प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात असिस्टंट कमांडटपदी निवड झालेले महेश जंजिरे यांनी केले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या रेसिडेन्सिअल हायस्कूलचे माजी विद्यार्थी असलेल्या महेश जंजिरे यांची 'युपीएससी'द्वारे केंद्रीय पोलिस दलात थेट निवड झाली आहे. त्यानिमित्त संस्थेच्या वतीने आयोजित विशेष समारंभात त्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे व सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना दरे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी महेश जंजिरे यांची यशोगाथा प्रेरणादायी असल्याचे सांगितले. परिस्थितीशी संघर्ष करतही स्पर्धा परीक्षेत मोठे यश मिळविता येते, हे महेश यांनी सिद्ध केले आहे, असे ते म्हणाले.

महेश जंजिरे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करताना नियमित अभ्यास, वाचनाची सवय आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व अधोरेखित केले. मराठी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे, कार्यकारिणी सदस्या अरुणा काळे, प्राचार्य धनंजय म्हस्के, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, प्रा. रवींद्र देवढे, प्रा. डॉ. सुधाकर सुंबे यांच्यासह विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांकडून प्रश्नांची सरबत्ती कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी महेश जंजिरे यांच्याभोवती गराडा घालत स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम, अभ्यास पद्धती, सामान्य ज्ञान आणि तयारीबाबत विविध प्रश्न विचारले. जंजिरे यांनीही विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत मार्गदर्शन करत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना भविष्यात मदत व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले.



# बारामतीत गॅस तुटवड्याच्या नावाखाली काळाबाजार

## जादा दराने विक्री करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती शहर व तालुक्यात घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काही गॅस एजन्सी चालक, वितरक व संबंधित व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणावर काळाबाजार केला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या प्रकारामुळे सामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक तसेच हॉटेल व्यवसायिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे, मन्सूर शेख आणि निलेश जाधव यांनी तहसीलदार तथा पुरवठा अधिकारी, बारामती यांना निवेदन देऊन या संपूर्ण प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक ठिकाणी ग्राहकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध करून दिले जात नसून कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे. काही एजन्सी व संबंधित वितरकांकडून शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक रक्कम आकारून गॅस सिलेंडरची विक्री केली जात असल्याचे प्रकार घडत आहेत. व्यावसायिक वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर अवैधरित्या साठवून जादा दराने विक्री केली जात असल्यामुळे नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

सदर प्रकार हा अत्यावश्यक वस्तू अधिनियम तसेच शासनाच्या पुरवठा नियमांचे उल्लंघन करणारा असून, यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. विशेषतः छोटे हॉटेल व्यावसायिक, टपरी चालक तसेच सर्वसामान्य कुटुंबांना वेळेवर गॅस उपलब्ध होत नसल्यामुळे दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत आहे.

प्रशासनाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये बारामती शहर व तालुक्यातील गॅस एजन्सी, गोदामे आणि संशयित ठिकाणी तात्काळ छापेमारी करावी, व्यावसायिक वापरासाठी असलेल्या गॅस सिलेंडरचा अवैधरित्या साठा करणाऱ्यांची चौकशी करावी, जादा दराने गॅस विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच नागरिकांना शासनाच्या निर्धारित दरानुसार नियमित गॅस पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशा प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

तसेच दोषी आढळणाऱ्या एजन्सी अथवा संबंधित व्यक्तींचे परवाने निलंबित करून कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. सामान्य नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

# रांजणगाव गणपती येथे 'छत्रपती महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर:**–रांजणगाव गणपती येथील मोरया मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती महाराजस्व समाधान शिबीर' अभियान उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाले. नागरिकांच्या विविध महसुली अडचणी, शासकीय सेवा व योजनांबाबत मार्गदर्शन करून त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत विविध महसुली सेवा व योजनांचा लाभ घेतला. अनेक प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला असून अर्जांची पडताळणी, कागदपत्रांची तपासणी तसेच नागरिकांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यात आले.

यावेळी शिरूर तालुक्याचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के नायब तहसीलदार सुवर्णा खरमाटे रांजणगाव पोलिस स्टेशनचे पोलीस निरिक्षक महादेव वाघमोडे जिल्हा परिषदेच्या सदस्या स्वाती पाचुंदकर पंचायत समितीचे सदस्य सागर देवकर भूमिअभिलेख उपअधिक्षक अमोल भोसले मंडळ अधिकारी तावरे मॅडम, तलाठी गणेश बिघोत, शारदा शिरसाठ, विकास नरवडे, मनोहर तेलंग, कपिल बोडरे, संतोष पोटावळे, पुरवठा निरीक्षक सदाशिव व्होनमाने, ,दुय्यम निबंधक बाबर यांनी शिबिरात नागरिकांशी संवाद साधला.

शिबिरात कृषी, ग्रामपंचायत, आरोग्य, वन, महावितरण, नागरी सुविधा केंद्र, समाज कल्याण, पंचायत समिती तसेच भूमी अभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेत आवश्यक मार्गदर्शन केले.

या शिबिरामध्ये उत्पन्न दाखले, रहिवासी दाखले, एनसीएल दाखले, मंजूर फेरफार, ७/१२ वरील अपाक शेरा कमी करणे, वारस नोंदी तसेच एकूमे शेरा कमी करणे यांसंदर्भातील विविध लाभ नागरिकांना देण्यात आले. लाभार्थ्यांना संबंधित कागदपत्रांचे वितरण करण्यात आले. याशिवाय आयुष्मान भारत योजनेची कार्डे तसेच रेशन कार्ड संदर्भातील विविध लाभांचेही वितरण करण्यात आले.

प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. 'छत्रपती महाराजस्व समाधान शिबीर' अभियानास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# लग्नसराईत 'बेसन-भाकर, कारळ चटणी'चा विसर !

## बदलत्या काळात हरवली ग्रामीण लग्नांची पारंपरिक चव

**विशाल फटांगडे । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** लग्न म्हटलं की लगीनघरी दोन-तीन दिवसांचा उत्साह, नातेवाईकांची गर्दी, गप्पा-गोष्टी आणि स्वयंपाकघरातून दरवळणारा बेसन-भाकर व कारळ चटणीचा सुगंध हे काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील लग्नसोहळ्यांचे जिवंत चित्र होते. मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे आणि वाढत्या धावपळीच्या युगामुळे आता या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा विसर पडताना दिसत आहे.

पूर्वी ग्रामीण भागात लग्नसराई म्हणजे केवळ दोन व्यक्तींचा नव्हे तर संपूर्ण गाव, नातेवाईक आणि भावकीचा सोहळा असायचा. लग्नाच्या काही दिवस आधीपासूनच नातेवाईक लग्नघरी मुक्कामी दाखल होत असत. घरातील महिलावर्ग, आस-पासच्या शेजारी, भावकीतील मंडळी एकत्र येऊन मोठ्या उत्साहात स्वयंपाकाची जबाबदारी सांभाळत असत. हळदीच्या दिवशी किंवा लग्नाच्या आदल्या दिवशी बेसन-भाकर आणि कारळ चटणी हा ठरलेला जेवणाचा मेनू असायचा.

साधा पण चविष्ट असा हा पारंपरिक बेत प्रत्येकाच्या आवडीचा होता. चुलीवर भाजलेली गरमागरम भाकर, बेसनाची रस्सेदार भाजी आणि तिखट-झणझणीत कारळ चटणी याचा आस्वाद घेताना नातेसंबंध अधिक घट्ट होत असत. जेवणासोबत गप्पा, हशा, कामातली धावपळ आणि आपुलकीचा स्पर्श यामुळे लग्नसोहळ्याला वेगळीच उब मिळत होती. मात्र काळानुसार लग्नसमारंभांची रूपरेषा बदलली आहे. आज अनेक ठिकाणी केटरिंग संस्कृती वाढली असून, पारंपरिक घरगुती स्वयंपाकाची जागा आधुनिक खाद्यपदार्थांनी घेतली आहे. पंजाबी, चायनीज, स्वीट डिश, फास्टफूड यांचा समावेश वाढत असताना बेसन-भाकर, कारळ चटणीसारखे ग्रामीण खाद्यपदार्थ मेनूमधून हद्दपार होत आहेत.

पूर्वी लग्नघरात नातेवाईक दोन-तीन दिवस मुक्कामी राहत असत. कामात मदत करत, रात्री उशिरापर्यंत गप्पा रंगत आणि लग्नघराची शोभा वाढवत असत. आता मात्र वेळेअभावी अनेक जण लग्नाला थेट उपस्थित राहून काही तासांत परत जातात. त्यामुळे सामूहिकता, आपुलकी आणि पारंपरिक रूढी-परंपरांवर नकळत लगाम लागत असल्याचे चित्र आहे.

ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या मते, आधुनिकतेचा स्वीकार आवश्यक असला तरी आपल्या खाद्यसंस्कृती आणि परंपरा जपण्याची गरज आहे. लग्नसराईत पुन्हा एकदा बेसन-भाकर आणि कारळ चटणीसारख्या पारंपरिक पदार्थांना स्थान मिळाले, तर नव्या पिढीला ग्रामीण संस्कृतीची खरी चव अनुभवता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बदलत्या काळात सुविधा वाढल्या, लग्नसोहळे भव्य झाले; मात्र त्या बदलांमध्ये ग्रामीण संस्कृतीचा आत्मा जपला जाणेही तितकेच महत्त्वाचे असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### हरवतीये लग्नघरातील आपुलकीची चव !

एकेकाळी ग्रामीण भागातील लग्नसोहळ्यांची खरी ओळख म्हणजे बेसन-भाकर, कारळ चटणी, सामूहिक स्वयंपाक आणि एकोप्याची परंपरा होती. शेजारी, नातेवाईक, भावकीतील मंडळी एकत्र येऊन स्वयंपाक करत, लग्नघरी मुक्कामी राहत आणि कामात हातभार लावत असत. स्वयंपाकघरातील गडबड, चुलीवरील भाकर, गप्पा-गोष्टी आणि सामूहिक जेवण यामुळे लग्नसोहळ्याला वेगळीच उब मिळत असे. मात्र आधुनिकतेच्या वाढत्या प्रभावामुळे, बदलती जीवनशैली आणि केटरिंग संस्कृतीमुळे ही परंपरा आता मागे पडताना दिसत आहे. भव्य मेनू, आधुनिक पदार्थ आणि वेळेच्या मर्यादांमध्ये ग्रामीण चवीसोबतच नात्यांतील उब, घरगुती आपुलकी आणि सामूहिकतेची भावना कमी होत चालल्याची खंत ज्येष्ठांकडून व्यक्त केली जात आहे.



# पेट्रोल पंपावर पुन्हा इंधनासाठी लांबच-लांब रांगा....

## कर्जतमध्ये इंधनाची कृत्रिम टंचाई सदृश्य परिस्थिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** इंधन दरवाढीनंतर आता इंधनाच्या टंचाईच्या कारणाने वाहनचालक-मालक त्रस्त झाले आहे. पुन्हा एकदा इंधन टंचाईच्या अफवेमुळे कर्जत शहर आणि तालुक्यातील बहुतांश पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या पहावयास मिळत आहे. विशेष म्हणजे वाहनांपेक्षा इंधन भरण्यासाठी ड्रमची रांग अधिक होती.

पेट्रोल-डिझेल दरवाढीने अगोदरच सर्वसामान्य नागरिक यासह वाहनचालक आणि मालकांच्या खिशाला चाट बसला असून यात आता इंधन तुटवड्याच्या पुन्हा एकदा सुटलेल्या अफवेने कर्जत शहरासह तालुक्यातील पेट्रोल पंपावर मोठमोठ्या रांगा सोमवार आणि मंगळवारी देखील पहावयास मिळाल्या. या अफवेने इंधन साठा करण्यासाठी अक्षरक्षा वाहन चालकांनी ड्रम सोबत घेत त्यांची रांगा लावल्या होत्या. इंधनाचे दर वाढतील आणि काही ठिकाणी तुटवडा जाणवत असल्याच्या अफवांमुळे नागरिकांनी पेट्रोल पंपांवर धाव घेतली. यामुळे पुरवठा सुरळीत असूनही काही वेळासाठी कृत्रिम टंचाई निर्माण झाली. अनेक पंपावर पेट्रोल-डिझेल संपल्याचे फलक झळकले होते. यामुळे वाहन चालकांना रांगा लावत मर्यादित इंधन तातकळत भरावे लागले. इराण- अमेरिका, इस्रायल या आखाती देशाच्या युद्धाची झळ भारतातील ग्रामीण भागात देखील आजमितीस पहावयास मिळते. पेट्रोल-डिझेल तुटवड्याबाबत कर्जत तालुका प्रशासनाकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता पुरवठा विभागास माहिती घेत ज्या ठिकाणी तुटवडा आहे त्याठिकाणी उचित कार्यवाही करीत प्राप्त तक्रारीची निश्चित निराकरण करण्याची ग्वाही तहसीलदार रवी सतवन यांनी दिली.

### शेतकऱ्यांची लगबग अन इंधनाचा तुटवडा

ग्रामिण भागात सध्या रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. मात्र त्यातच आता इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याने दुष्काळात तेरावा महिना अशी अवस्था झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

# नान्नजमध्ये भिषण पाणीटंचाई



## टँकर सुरू करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथे ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. उन्हाळ्याची तीव्रता जसजशी वाढत आहे, तसतशी ग्रामीण भागात पाण्यासाठी तीव्र चणचण भासू लागली आहे. या पार्श्वभूमीवर नान्नज येथील सामाजिक कार्यकर्ते उदय पवार व ग्रामस्थांनी जामखेडचे तहसीलदार यांना निवेदन देऊन गावात तात्काळ पाण्याचा टँकर सुरू करण्याची मागणी केली आहे.

नान्नज गावातील विहिरी, बोअरवेल तसेच इतर पाण्याचे स्त्रोत पूर्णपणे आटले आहेत. त्यामुळे विशेषतः महिला भगिनींना कडक उन्हात दूरवरून पाणी आणावे लागत असून त्यांची मोठी वणवण होत आहे.

नान्नज गावाला शेजारील धोंडपारगाव येथील तलावातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, यंदा उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे या तलावातील पाणीसाठा संपुष्टात आला आहे. मुख्य स्त्रोतच कोरडा पडल्याने गावची अधिकृत पाणीपुरवठा योजना पूर्णपणे कोलमडली आहे. नागरिकांना नियमित आणि पुरेसे पिण्याचे पाणी मिळत नसल्याने अनेक भागांत पाण्यासाठी हाहाकार उडाला असून, अशुद्ध किंवा अपुऱ्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही आता गंभीर बनला आहे.

# ऑनलाइन औषधविक्रीवर पायबंद घाला - केमिस्ट असो.

## पाथर्डी तालुका केमिस्ट संघटनेचा : आरोग्य मंत्र्यांना घेराव घालण्याचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या ऑनलाईन औषधी विक्रीवर शासनाने तत्काळ बंदी घालत अनैतिक पद्धतीने औषधविक्री करणाऱ्या कंपन्यावर पायबंद घालावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन देत पाथर्डी तालुका केमिस्ट संघटनेच्या वतीने करण्यात आली.

अनेक ऑनलाईन कंपन्या या मोबाईलच्या एका क्लिकवर नार्कोटिक्स अर्थात नशा येण्यासाठी घेण्यात येणारी औषधे, गर्भनिरोधक औषधे, झोपेच्या गोळ्या तसेच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री होणाऱ्या अनेक औषधांची विक्री करत ते थेट घरपोच देत असून याद्वारे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप यावेळी केला. तसे मागणीचे निवेदन तहसीलदार उद्धव नाईक व पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना देण्यात आले.

यावेळी तालुका केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सुहास जरांगे, संतोष जिरेसाळ म्हणाले की, ज्या औषधांच्या विक्रीवर सामान्य मेडिकल दुकानांमध्ये कडक नियम आहेत, तीच औषधे ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर कुठलीही शहानिशा न करता कमी किमतीत अगदी सहज उपलब्ध होत आहेत. ऑनलाईन औषधी विक्री करणाऱ्या या साईट्स अथवा कंपन्या या डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन न तपासता औषध विक्री करत असल्याने युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढत आहे.

अन्यथा आरोग्यमंत्र्यांना घेराओ घालण्याचा इशारा दिला आहे.

या आंदोलनात प्रकाश पालवे, अशोक गांधी, पंकज मुनोत, गणेश बाहेती, संदीप लोखंडे, जालिंदर सदावर्ते, पांडू मंत्री, मुन्ना शेठ जाजू, अरुण आंधळे, सय्यद फैयाज, राहुल कांबळे, अविनाश पालवे, धनंजय फुंदे, सोमनाथ फासे आदी उपस्थित होते.

# श्रीगोंदा फसवणुकीचा 'हॉटस्पॉट' बनतोय का?

## एकामागून एक घोटाळ्यांनी तालुका हादरला

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात गेल्या काही वर्षांत आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणांनी अक्षरशः थैमान घातले आहे. श्रीगोंदा फसवणुकीचा हॉटस्पॉट बनतोय का? असा गंभीर प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीगोंद्यात सुरुवात झाली सिस-पे, इन्फिनिटी बिकन, ग्लोबल ट्रेडिंग कंपनीच्या नावाखाली शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून झालेल्या मोठ्या फसवणुकीपासून. हजारो गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आणि अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले. अनेकांना मोठी झळ पोहचली आहे. सिस्पे कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यानंतर अनेकांच्या घरातील विवाह मोडले. दुर्धर आजारातील व्यक्तींना उपचाराअभावी मृत्यूला कवटाळावे लागले. मात्र यातील अनेक एजंट आजही आलिशान गाड्यातून तोंडलपवत फिरत आहेत यामध्ये अनेकांवर गुन्हे दाखल झाले आहे. त्यानंतर समर्थ क्रॉप केअरच्या माध्यमातून अशाच प्रकारची गुंतवणूक योजना आली आणि पुन्हा अनेक नागरिक कोट्यवधी रुपयांना फसले. त्यानंतर तालुक्याच्या राजधानी मधील साई सेवा पतसंस्था आणि विविध मल्टीस्टेट योजनांमध्येही मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी आल्या. आंदोलने उपोषणे झाली प्रशासनाने अजूनही कठोरात कठोर कारवाई केली नसल्यामुळे ठेवीदार हवालदिल झाले आहे. त्यातच आता आढळगावमध्ये गुंतवणूक करा, अर्ध्या किमतीचे सोने मिळवा व अर्ध्या किमतीचे दरमहा व्याज मिळेल अशी संकल्पना एका युवकाने गावातील काही सहकार्याच्या मदतीने पुढे आणली. त्यामध्ये कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक झाल्याने. गोर गरीब नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली. स्थानिकांच्या मते, सिस पे, इन्फिनिटी बिकन, ग्लोबल ट्रेडिंग, समर्थ क्रॉप केअर, साई सेवा पतसंस्था आणि आता आढळगावमधील कागदावरील ११ कंपन्यामधील फ़सवणूक या सर्व योजनांमधून श्रीगोंदा तालुका हजारो कोटी रुपयांनी लुटला गेला आहे. मात्र, इतक्या मोठ्या घोटाळ्यांनंतरही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण असून, पुढचा नंबर कोणाचा? अशी चर्चा गावागावात सुरू आहे. यामध्ये फक्त गुन्हे दाखल करून चालणार नाही; आरोपींवर कठोर कारवाई कधी होणार आणि गुंतवणूकदारांचे पैसे परत कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आढळगावात राहणारा ११ कंपन्यांचा डायरेक्टर असून त्यांच्या पत्नीच्या नावे तसेच आई संचालक असणाऱ्या तब्बल ४ कंपन्या असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

# उघड्यावरील रोहित्र.. जिर्ण पोल.. अन् लोंबकळणाऱ्या तारा...

## जुनी विद्युत यंत्रणा धोकादायक अवस्थेत; नागरिकांचा जीव टांगणीला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील अनेक गावांमध्ये वीज वितरण यंत्रणेची अत्यंत दयनीय अवस्था समोर येत असून, उघड्यावर असलेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर), खाली लोंबकळणाऱ्या विद्युत तारा तसेच झुकलेले विद्युत पोल नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक ठरत आहेत. साधारणपणे १९७० ते ८० च्या दशकांपूर्वी उभारण्यात आलेल्या विद्युत वाहिन्या आणि पोल अद्यापही त्याच अवस्थेत वापरले जात असल्याने नागरिकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

गावांतील वाड्या-वस्त्यांवर अनेक ठिकाणी रोहित्र उघड्या अवस्थेत आहेत. त्यामुळे लहान मुले, जनावरे तसेच शेतकरी धोक्याच्या छायेखाली वावरत आहेत. काही ठिकाणी रोहित्राजवळ गवत वाढलेले असून, ठिणग्या पडल्यास आग लागण्याचाही धोका निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात या उघड्या यंत्रणेमुळे विजेचा धक्का लागण्याच्या घटना घडू शकतात अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी महावितरण कंपनीकडून अशा धोकादायक विद्युत वाहिन्या, पोल, रोहीत्रांची पाहणी करून दुरुस्ती करण्याची गरज आहे.

अनेक ठिकाणी विद्युत तारा अत्यंत खाली लोंबकळलेल्या अवस्थेत दिसत आहेत. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तारांना स्पर्श करत असल्याने वीजपुरवठा खंडित होणे, शॉर्टसर्किट होणे किंवा स्पार्किंगच्या घटना वारंवार घडत आहेत. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना सतत जीव धोक्यात घालून वावरावे लागत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. अनेक पोल झुकलेल्या अवस्थेत असून, काही पोलांना तडेही गेले आहेत. जोरदार वारा किंवा पावसात हे पोल कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. यापूर्वी तालुक्यात अनेक शेतकरी तसेच पशुधनांचे विजेच्या धक्क्याने बळी गेलेले आहेत.

जीर्ण झालेले पोल अजूनही वापरात आहेत मात्र त्यांची दुरुस्ती किंवा बदल करण्याकडे दुर्लक्ष होत आहे.अशी नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत. तालुक्यातील ग्रामीण भागात शेतीपंपांसाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत वाहिन्यांचीही अवस्था बिकट झाली आहे. काही ठिकाणी तारा इतक्या खाली आल्या आहेत की ट्रॅक्टर किंवा ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांनाही अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच महावितरणने तातडीने सर्वेक्षण करून धोकादायक पोल, तारा आणि रोहित्र बदलण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती आणि सुरक्षितता उपाय न झाल्यास भविष्यात गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महावितरण कंपनीने तात्काळ पाहणी करून उपाययोजना करण्याची मागणी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ हारेर, माजी सरपंच बापूसाहेब आव्हाड, राजू दारकुंडे, बंडू पवार, पप्पू ससे, गणेश विरकर, बाजीराव आवारे, सरपंच ज्योती तोडमल, उपसरपंच अनिता बनकर यांच्यासह तालुक्यातील विविध गावच्या ग्रामस्थांमधून होत आहे.

अनेक शाळा परिसरात असणारे रोहित्र उघड्या अवस्थेत दिसून येतात. त्यामुळे लहान मुलांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. तसेच वनक्षेत्राच्या हद्दी मधून विद्युत वाहिन्या गेलेल्या आहेत. स्पार्किंग मुळे वनवा पेटून वनसंपदेचे देखील मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे तालुक्यात महावितरण कंपनीने पाहणी करून दुरुस्ती करणे गरजेचे आहे. अन्यथा पावसाळ्यात अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.
**सुनील पवार (युवा नेते)**



## द•ख•ल

### अधिक मासानिमित्त श्री मोहटादेवी मंदिरात आंब्यांच्या फळांची सजावट



**पाथर्डी :** अधिक मासातील मंगळवारचे औचित्य साधत पाथर्डी तालुक्यातील महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या श्री मोहटादेवी मंदिरात आंब्यांच्या फळांनी अत्यंत आकर्षक व मनमोहक सजावट करण्यात आली. या अनोख्या सजावटीमुळे मंदिर परिसर दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे विशेष आकर्षण ठरले. श्री मोहटादेवीच्या गाभाऱ्यात विविध प्रकारच्या आंब्यांच्या फळांची सुंदर आरास करण्यात आली होती. देवीच्या चरणी आंब्यांचा नैवेद्य अर्पण करून मंदिर परिसर फुलांनी व फळांनी सजविण्यात आला होता. देवीच्या मूर्तीसमोर रचलेली आंब्यांची आकर्षक मांडणी आणि पारंपरिक सजावटीमुळे गाभाऱ्याचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. पुरुषोत्तम मासाला हिंदू धर्मात विशेष धार्मिक महत्त्व असून या काळात देवी-देवतांची पूजा, अभिषेक, आरती, नामस्मरण आणि धार्मिक कार्यक्रमांना महत्त्व असते. त्यानिमित्ताने श्री मोहटादेवी मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक भाविकांनी देवीचे दर्शन घेत मनोकामना व्यक्त केल्या. मंदिर प्रशासनाच्या वतीने भाविकांसाठी दर्शनाची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली होती. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होऊन आई राजा उदो उदो च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. अधिक मासाची पर्वणी साधत देवीचा आशीर्वाद मिळवण्यासाठी जिल्ह्यातील तसेच राज्यातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते.

### दहेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार




**शेवगाव :** तालुक्यातील दहिफळ जुने येथील श्री मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्थेच्या दहेश्वर माध्यमिक विद्यालयाचा फेब्रुवारी २०२६ च्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल ६६.६६ टक्के लागला. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या परीक्षेत कु. तनुजा कल्याण साळुंखे हिने ३९४ गुण (७८.८० टक्के) मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. कु. सुप्रिया बाळू गायकवाड हिने ३०८ गुण (६१.६० टक्के) मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. जयश्री कडूबाळ जरांगे हिने २९१ गुण (५८.२० टक्के) प्राप्त करून तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदू पांडुरंग भोसले यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे, विशाल जोशी, भगतसिंग मुराडे, राजाराम लिंभोरे, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे आदी उपस्थित होते.

### पाथर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये गतिरोधक बसविण्याची मागणी



**पाथर्डी :** शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील इंदिरानगर, शिवशक्तीनगर, एडके कॉलनी व फुलेनगर परिसरात भरधाव वाहनांच्या वाढत्या वेगामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः अंतर्गत रस्ते, शाळांच्या परिसरातील मार्ग तसेच वर्दळीच्या ठिकाणी वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे उल्लंघन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ८ 'ब' चे नगरसेवक प्रतीक राजेंद्र नांगरे आणि मनिषा उदमले यांनी पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड व मुख्याधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. या भागांमध्ये तातडीने आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवावेत, अशी मागणी त्यांनी केली. या परिसरात लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात ये-जा करीत असतात. अनेक रस्त्यांवर वाहनांचा वेग नियंत्रणाबाहेर जात असल्याने भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### ऊसतोडणी मजुरांच्या आरोग्य लढ्याचा सन्मान



**खरवंडी कासार :** ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांचे आरोग्य संरक्षण हेच आमचे मिशन आहे. राज्यातील उपेक्षित व वंचित कामगारांच्या आरोग्य प्रश्नांवर ताकाळ उपाययोजना व्हाव्यात, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहे. असा विश्वास देवनाथ फौंडेशनचे डॉ. ज्ञानेश्वर दारडे यांनी व्यक्त केला. ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांच्या आरोग्य विषयक प्रश्नांनांची दखल घेतल्याने डॉ. दारडे यांना पदमश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यापुढे त्यांनी आगामी काळात हा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त केला. अहिल्यानगर, बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना तसेच मराठवाड्यातील मोठ्या संख्येने ऊसतोड मजूर सहा महिने घरदार सोडून स्थलांतर करतात. या काळात त्यांना अपुरी राहण्याची व्यवस्था, महिलांसाठी स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव, लहान मुलांसाठी वसतीगृहांची कमतरता, ऊस वाहतुकीदरम्यान होणारे अपघात तसेच तातडीच्या आरोग्यसेवेचा अभाव या समस्यांना सामोरे जावे लागते. या सर्व प्रश्नांवर शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे डॉ. दारडे यांनी सांगितले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.२० मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## वडाळा महादेव अपघातातील जखमी प्रतीकचा उपचारादरम्यान मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील निमोनि मळा या ठिकाणी ट्रॅक्टर व दुचाकीचा भीषण अपघात झाला यामध्ये नाऊर येथील तरुण रोहित अहिरे यांचा जागीच मृत्यू झाला होता. तसेच या अपघातामध्ये प्रतीक अनिल गोरे (वय २२) कमलपूर सदरचा तरुण या अपघातामध्ये गंभीर स्वरूपात जखमी होता वैद्यकीय उपचारादरम्यान कमलपूर येथील प्रतीक अनिल गोरे या तरुणाचा मृत्यू झाल्याने परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. प्रतीक गोरे येथील माजी सरपंच अनिल गोरे यांचे चिरंजीव होते. सदर अपघात ठिकाणी पोलीस उपविभागीय अधिकारी देवदत्त भवर तसेच पोलीस निरीक्षक नितीन देशमुख पोलीस उपनिरीक्षक दादाभाई मगरे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहे.

# साधुसंतांच्या आशीर्वादाने आमदारकीच्या नव्या जबाबदारीची सुरुवात : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : विधानभवनात आमदारकीची शपथ घेतल्यानंतर पहिल्याच दिवशी धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा योग लाभणे हे माझे भाग्य असून, साधुसंतांच्या आशीर्वादाने नव्या राजकीय जबाबदारीची सुरुवात होत असल्याची भावना आमदार विवेक कोल्हे यांनी व्यक्त केली. सिन्नर तालुक्यातील कारवाडी (शहा) येथे १५ मे २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ केंद्र व श्री दत्त ध्यान केंद्राच्या वास्तुशांती आणि लोकार्पण सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात श्री स्वामी समर्थ कथा, अखंड नामजप यज्ञ तसेच श्री गुरुचरित्र पारायण यांसारखे धार्मिक उपक्रम संपन्न झाले. यावेळी आ. विवेक कोल्हे सपत्नीक उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना आ. कोल्हे म्हणाले की, श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अध्यात्मिक ऊर्जेमुळे अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आहेत. या केंद्राच्या सानिध्यात नवचैतन्याची अनुभूती मिळते. भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे हा स्वामींचा संदेश संकटसमयी आधार देणारा आहे. संयम आणि श्रद्धा ठेवून प्रत्येकाने जीवनात सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारल्यास अंधारानंतर प्रकाश निश्चित येतो, ही स्वामींची शिकवण समाजाला मार्गदर्शक ठरते.

यावेळी स्वामी सेवेकरी तथा कथाकार संतोष भाऊ जाधव यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही आपली मनोगते व्यक्त करत अध्यात्म, समाजसेवा आणि जनकल्याण यांचा संगम अशा उपक्रमांतून होत असल्याचे सांगितले. या सोहळ्यास दिंडोरी दरबाराचे प्रमुख परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, श्रीक्षेत्र गोदाधाम सरला बेटाचे मठाधिपती परमपूज्य स्वामी रामगिरीजी महाराज, संत जनार्दन स्वामी समाधी स्थान कोपरगाव बेटाचे स्वामी रमेशगिरीजी महाराज, हरिपाठ आश्रम शिर्डीचे महामंडलेश्वर स्वामी काशिकानंदजी महाराज, कुंभारी येथील राघवेश्वरानंद गिरीजी महाराज यांच्यासह अनेक संत-महंत उपस्थित होते.

तसेच खासदार राजाभाऊ वाजे, माजी मंत्री तथा आमदार माणिकराव कोकाटे, सुदर्शन समूहाचे प्रमुख सुरेश चव्हाणके, कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान, रेणुकाताई कोल्हे, अरुणराव येवले, अशोकराव भाकरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर ठाकरे, स्वप्निल भोसले, केदारनाथ तनपुरे, दिलीपराव बनकर, कारवाडीच्या सरपंच रुपाली जाधव यांच्यासह परिसरातील स्वामी सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चोरट्या वाळू वाहतुकीवर गुन्हे शाखेची कारवाई, ३.२० लाखांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : चोरट्या वाळूची वाहतूक करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने राहुरी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करुन अवैध धंद्याची माहिती फ गुप्त बातमीदारामार्फत १७ मे रोजी राहुरी शहरातील १८ एकर परिसरात एक इसम टेम्पोमध्ये चोरुन वाळुची वाहतुक करत असल्याची माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ राहुरी शहरातील १८ एकर परिसरात जावुन सापळा रचलेल्या ठिकाणी संशयित टेम्पो येतांना दिसला त्यावेळी पथकाने सदर टेम्पो थांबवुन चालकास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नांव गाव विचारले असता त्याने त्याचे नांव १) अकील कासम पठाम वय- २८ वर्षे रा.देसवंडी ता. राहुरी जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगितले.

सदर इसमास टेम्पोचे मालकाबाबत विचारपुस केली असता त्याने टेम्पोचे मालक २) ओमकार संजय तनपुरे रा. तनपुरेवाडी ता.राहुरी असे असल्याचे सांगितले. आरोपीच्या ताब्यातून २०,०००रु किमंतीची २ ब्रास वाळु, ३,००,००० रु किमतींचा एक टाटा कंपनीचा ४०७ टेम्पो, असा एकुण ३,२०,००० रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून आरोपींविरुद्ध राहुरी पोलीस ठाणे गु.र.नं. ५४१/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार भगवान थोरात, रमीज राजा अत्तार, प्रकाश मांडगे, विशाल तनपुरे चालक उत्तरेश्वर मोराळे आदींनी केली आहे.

## माहिती अधिकार ऑनलाईन माहिती संकेतस्थळाच्या क्षमतेत वाढ




शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : माहिती अधिकाराअंतर्गत ऑनलाईन माहिती देणाऱ्या संकेतस्थळाच्या सर्व्हरची क्षमता वाढविण्यात आली आहे. आता मंत्रालयीन विभागांसह राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे आदींशी संबंधित माहिती एकाच संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे माहिती मिळण्याची प्रक्रिया जलद होण्याची शक्यता आहे.

**निर्णयाचे स्वागत**

माहिती अधिकाराअंतर्गत ऑनलाईन माहिती देणाऱ्या संकेतस्थळाच्या सर्व्हरची क्षमता वाढविण्यात आली आहे. यामुळे वेळेची बचत होऊन कामास गती मिळेल.

**संजय थोरात, श्रीरामपूर**

सध्याच्या माहिती अधिकार संकेतस्थळावर केवळ मंत्रालयीन विभाग, पोलिस आयुक्त, जिल्हाधिकारी अशा निवडक २१५ विभागांची माहिती मिळविण्याकरिता अर्ज करता येतो. पोर्टलच्या मर्यादित सर्व्हर क्षमतेमुळे राज्यातील उर्वरित क्षेत्रीय कार्यालयांचा त्यावर समावेश करता येत नव्हता.

परंतु, आता हे पोर्टल अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. त्याच्या व्यवस्थापन आणि समन्वयाकरिता प्रकल्प अंमलबजावणी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून राज्यातील सर्व क्षेत्रीय, कार्यालये, महामंडळे, विभागांअतर्गत येणारी कार्यालये यांचा टप्प्याटप्प्याने पोर्टलवर समावेश केला जाईल. संकेतस्थळाची व्याप्ती वाढल्याने सरकारशी संबंधित कुठल्याही विभागाची माहिती एका संकेतस्थळावर उपलब्ध होईल.त्यात गृहनिर्माण विभागाअंतर्गत म्हाडा, एसआरए अशी विविध कार्यालये आहेत. संबंधित कार्यालयातून माहिती घ्यावयाची असल्यास ती या एकाच संकेतस्थळाच्या माध्यमातून मिळविणे शक्य होईल.

याच पोर्टलवर संबंधित कार्यालयाच्या नोडल अधिकाऱ्यांचीही नोंद असेल. या अधिकाऱ्याला आपल्या कार्यालयात येणारे अर्ज किती, त्यातील निकाली किती लागले, किती प्रलंबित आहेत, याची माहिती घेता येणे शक्य होणार आहे.

# अवैद्य गावठी कट्टा बाळगणाऱ्याला अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत अवैध्य गावठी कट्टा बाळगणा-या नेवासा तालुक्यातील देवसडे येथील अविनाश सावंत इसमाविरुध्द नेवासा पोलीसांनी मोठी कारवाई करत गावठी कट्टा बाळगणा-या या इसमाला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की नेवासा तालुक्यातील देवसडे येथील अविनाश व्दारकानाथ सावंत हा स्वतःचे कब्जात गावठी कट्टा (पिस्तुल) घेवुन कुकाणा येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यानुसार नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले,सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार यांनी पोलीस पथकासह जावुन अविनाश सावंत यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे पन्नास हजार रुपये किंमतीचा एक गावठी बनावटी कट्टा (पिस्तुल) मिळुन आला. सदर घटनेबाबत पोकॉ हरिभाऊ धायतडक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नेवासा पोलीस स्टेशन गु.र.नं. ४०३/२०२६ शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदरची कारवाई अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक एम.सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौर, वैभव कलुबर्मे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले सहायक पोलिस निरीक्षक अमोल पवार,पोहेकॉ शहाजी आंधळे, पोकॉ आप्पासाहेब वैद्य, हरिभाऊ धायतडक,पोकॉ अमोल डमाळे यांनी केली आहे. पुढील तपास पोहेकॉ शहाजी आंधळे नेवासा पोलीस स्टेशन हे करीत आहे.

# नदीजोड प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करा : ना. विखे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : राज्यातील महत्त्वाच्या नदीजोड प्रकल्पांची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. कोकण-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी तसेच कोकण-गोदावरी वळण योजना या नदीजोड प्रकल्पांचा सविस्तर आढावा मंत्री श्री. विखे पाटील यांनी आज घेतला. आयोजित बैठकीमध्ये प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेताना मंत्री विखे पाटील यांनी कामांची गती वाढवून प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याचे निर्देश दिले.

राज्याच्या दीर्घकालीन जलव्यवस्थापनासाठी तसेच दुष्काळग्रस्त भागांना दिलासा देण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात प्रस्तावित हा प्रकल्प दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील अतिरिक्त उपलब्ध पाणी उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यात वळविण्यासाठी राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे नाशिक जिल्ह्यातील अवर्षणप्रवण सिन्नर तालुक्यास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असून घरगुती वापरासाठी तसेच दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठीही पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच गोदावरी नदीत पाणी सोडल्यामुळे मराठवाड्यातील प्रकल्पाच्या लाभक्षेत्रालाही मोठा दिलासा मिळणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. प्रकल्पांतर्गत निलमाती, मेट, कोशिमशेत, उधळे आणि बोरखिंड अशी पाच धरणे प्रस्तावित आहेत.

यापैकी उधळे आणि मेट धरणांची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून कोशिमशेत, निलमाती आणि बोरखिंड धरणांच्या मोजणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. ही सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. बैठकीस ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्यासह यवतमाळचे जिल्हाधिकारी, पालघर येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी तसेच वन विभागाचे अधिकारी आणि संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# महिलेच्या खूनप्रकरणी आरोपीला जन्मठेप; पुराव्यांच्या जोरावर गुन्हा सिद्ध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : विवाहित महिलेसोबत अनैतिक संबंध ठेवून तिचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपीस राहता येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतानाही पोलिस निरीक्षक नंदकुमार दुधाळ यांनी परिस्थितीजन्य पुरावे भक्कमपणे गोळा करून न्यायालयात सक्षमपणे मांडल्याने आरोपीला शिक्षा सुनावण्यात आली.

दि. १६ जुलै २०२३ रोजी राहाता तालुक्यातील सावळीविहीर येथील आरोपी अजय राजेंद्र म्हस्के यांचे विवाहित महिला सविता सुनील बत्तिसे हिच्यासोबत अनैतिक संबंध होते.गेल्या काही वर्षांपासून दोघे एकत्र राहत होते.आरोपी दुसरे लग्न करणार असल्याच्या कारणावरून दोघांमध्ये वारंवार वाद होत होते.याच रागातून आरोपीने सविता हिच्यावर धारदार चाकूने गळ्यावर वार करून तिचा खून केला होता.या प्रकरणी शिर्डी पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली.

सदरच्या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक नंदकुमार दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तपासादरम्यान कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नसतानाही त्यांनी परिस्थितीजन्य पुरावे, तांत्रिक माहिती, साक्षीदारांचे जबाब व घटनास्थळावरील पुरावे यांची साखळी मजबूत केली. न्यायालयात सादर करण्यात आलेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यात यश आले.

या तपासात पोलिस निरीक्षक सोपान शिरसाठ, सहाय्यक पोलिस निरीक्षक संभाजी पाटील, पोहेकॉ संदीप गडाख व पोलिस कर्मचारी कैलास राठोड यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. सदर खटल्याची सुनावणी राहता येथील जिल्हा व सत्र न्यायालयात झाली.

न्यायाधीश राजेश एस. गुप्ता यांनी आरोपी अजय राजेंद्र म्हस्के यास दोषी ठरवत जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. डी. जी. पानगव्हाणे यांनी काम पाहिले.

## आ . बोंढारकर यांचे सपत्नीक साईदर्शन, दै. राष्ट्र सह्याद्री शिर्डी कार्यालयास भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव (तिडके)बोंढारकर यांनी काल साई समाधीचे दर्शन घेत राष्ट्र सह्याद्री शिर्डी कार्यालयास भेट देत सदिच्छा व्यक्त केल्या. दर्शनानंतर त्यांचे साई संस्थानचे वतिने सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्री कार्यालयास भेट दिली असता त्यांचे स्वागत शिर्डी कार्यालय प्रमुख अशोक दुशिंग यांनी करत त्यांचा साईशाल, डायरी, कॅलेंडर देत सत्कार करण्यात आला.






यावेळी बोलताना ते म्हणाले की, साईच्या दर्शनाने शांती समाधान मिळते मनामध्ये ऊर्जा निर्माण होते बाबा त्रिकालदर्शी व्याप्ती आहे भक्तांना सर्व काही मिळते साई त्यांचं दुःख हरण्याचं काम करत असतात शिर्डी हे आदराचे स्थान म्हणून ओळखले जाते. जनसेवेचा वसा पुढे न्यावा जनतेचे कार्य अधिकच व्हावं दिन-दुबळ्यांची सेवा व्हावी तसेच नांदेड मधील जनता सुखी समाधानी झाली पाहिजे व येथील विकास वेगाने व्हावा अशी साईबाबा चरणी प्रार्थना करत साईंचे दर्शन घेऊन धन्य झालो असल्याची प्रतिक्रिया आमदार बोंढारकर यांनी दिली. आ. आनंदराव पाटील( तिडके) बोंढारकर हे महाराष्ट्रातील नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. ते शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. नांदेड दक्षिण मतदारसंघातून ते पहिल्यांदाच विधानसभेवर निवडून आले आहे.

त्यांनी आपल्या मतदारसंघात जनसंपर्क कार्यालये सुरू केली आहेत आणि विविध स्थानिक प्रश्नांवर ते सातत्याने आवाज उठवतात. त्यांनी नांदेड शहर आणि ग्रामीण भागातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची पाहणी करून त्यांना मदत मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

तसेच, नुकतेच त्यांनी पाठपुरावा करून नांदेडमधील हजारो शेतकऱ्यांसाठी पिक विमा मंजूर करून घेतला आहे. यावेळी त्यांचे समवेत त्यांच्या पत्नी सरस्वती तिडके बोंढारकर, मुले गंगेश, योगेश, संगिता नरोडे, प्रियंका नरोडे, पुणे येथील साहित्यीक आदीत्य पटाईत, साई भक्त नानासाहेब शिंदे, अविनाश शिंदे उपस्थित होते.